१६ जुलै २००९

प्रिय श्रीयुत जयराम रमेश,

सागर किनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसुचना,२००८ च्या मसुद्यावरील प्रतिक्रियांचे मूल्यमापन करण्याची संधी दिल्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. पर्यावरण शिक्षण केंद्र, अहमदाबाद या संस्थेने संपूर्ण देशभर आयोजित केलेल्या ३५ परिसंवादामध्ये, विविध संस्था-समुंहानी व्यक्त केलेल्या लेखी आणि मौखिक प्रतिक्रियांचा आम्ही अभ्यास केला. यानंतर केंद्र आणि राज्य सरकार व मुंबई महानगर प्रशासनाचे प्रतिनिधी तसेच मच्छिमार व महिलांच्या प्रतिनिधींबरोबर केलेल्या चर्चेअंती आम्ही काही शिफारशी तयार केल्या आहेत. ज्या यापत्रासोबत जोडलेल्या अहवालामध्ये नमूद केल्या आहेत.

आम्ही अशी विनंती करतो की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसुचना, २००८ रद्द करण्यात यावी. सागर किनारा नियमन क्षेत्र अधिसुचना, १९९१ ही मुलभूत चौकट मानून काही योग्य ते बदल विचारात घ्यावे. विशेषतः वातावरण बदलामुळे समुद्राच्या पातळीत होणारी वाढ आणि सागरकिनाऱ्यावरील जैवविविधता व संसाधनांवर वाढत्या लोकसंख्येचा दबाव पाहता काही बदल आवश्यक आहेत. पर्यावरण आणि लोकांची उपजीवीका अशा दोन्हींचा एकत्रित विचार करणाऱ्या कृतीशील नियमावलीचा विकास करताना हे लक्षात घ्यावे लागेल कि त्यावर समुद्रकिनाऱ्यापासून ५० कि.मी. क्षेत्रात राहणारी २५ टक्के लोकसंख्येंचे जीवित आणि उपजीवीका आणि जवळजवळ १ कोटी मच्छिमार लोकांचे जीवन अवलंबून आहे. या नियमावलीबरोबरच सागरी परिसंस्थेचे फायदे आज आणि उद्यासाठी कायमस्वरुपात होत राहण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत लोक शिक्षण व लोकसंघटन करणेसुद्धा महत्त्वाचे आहे.

सदर काम एका महिन्याच्या आत पुर्ण करण्यासाठी आपण आणि मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल पुन्हा एकदा आभार मानतो.

सदिच्छांसह,

आपले नम्र,

**प्राध्यापक एम.एस.स्वामिनाथन**
(अध्यक्ष)
*अध्यक्ष, एम.एस.स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन*

**डॉ. शैलेश नायक**
(सदस्य)
*सचिव, मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सेस*

**श्रीमती सुनिता नारायण**
(सदस्य)
*संचालक, सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट*

**श्री. जे. एम. माऊस्कर**
(सदस्य)
*अतिरिक्त सचिव, पर्यावरण आणि वन मंत्रालय*

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| सारांश | ३ |
| समितीची कार्यकक्षा आणि कार्य | ५ |
| परिचय: सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ची पार्श्वभूमी | ६ |
| सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या मसुद्यावरील प्रतिक्रिया | १० |
| कार्यकक्षा १: सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ बाबत मंत्रालयाकडे आलेल्या प्रतिक्रियांचे मुल्यांकन | १२ |
| कार्यकक्षा १: समितीच्या शिफारसी | १४ |
| कार्यकक्षा २: एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनाकरिता धोरण व कायदेशीर चौकटीबद्दल सूचना | १५ |
| भविष्यकालीन कार्यक्रम | १६ |
| परिशिष्ट | ३१ |

# सारांश

दिनांक १५ जून २००९ रोजी भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने प्रध्यापक एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मुसद्याबाबत पुढील योजना सूचविण्यासाठी चार सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या अन्य सदस्यांमध्ये, डॉ. शैलेश नायक, सचिव, मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सेस; श्री.जे. एम.माऊस्कर, ॲडिशनल-सेक्रेटरी, पर्यावरण आणि वन मंत्रालय आणि श्रीमती सुनिता नारायण, संचालक, सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट याचा समावेश होता. या समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली होती :

१. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र २००८ च्या मसुद्यावर मंत्रालयास प्राप्त झालेल्या सूचनांचे मुल्यमापन करणे.

२. एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनासाठी धोरण आणि कायदेशीर चौकट सूचविणे.

या समितीने केलेल्या चर्चाविमर्षात असे लक्षात आले की सागरकिनारा क्षेत्राशी निगडीत अनेक प्रश्न आहेत ज्याच्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. समितीला मिळालेला मर्यादीत कालावधी लक्षात घेता समितीने अशा प्रश्नांना या रिपोर्टमध्ये अधोरेखीत केले आहे, जेणेकरुन नंतर त्याबाबत पाठपुरावा करणे शक्य होऊ शकेल. या समितीने असे सूचविले आहे की शासनाने पुढाकार घेत काही परिसंवाद घेऊन सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसुचना, १९९१ मध्ये काही उचित बदल करावे.

**समितीचा शिफारशी :**

समितीला असे स्पष्टपणे वाटते की आज भारताचा समुद्रकिनारा दोन बाजूंनी असुरक्षित बनला आहे. एका बाजूला, समुद्रकिनाऱ्यांवर औद्यगिक आणि नगरविकासांचा वाढता दबाव आहे; आणि दुसऱ्या बाजूला, वातावरण बदलामुळे निर्माण होणारी चक्रीवादळे, महाकाय लाटांचे तडाखे आणि अलीकडच्या काळातील समुद्राच्या पातळीत होणारी वाढ यांचा धोका आहे. यामधून समुद्रकिनारा आणि त्यावर राहणाऱ्या लोकांच्या संरक्षणासाठी सदैव दक्ष राहण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच, समुद्रकिनारे म्हणजे मच्छिमार समाजाचे अधिवास आहेत. हा समाजदेखील दुहेरी संकटात आहे. एका बाजूला सागरी पर्यावरणाचे संवर्धन आणि दुसऱ्या बाजूला विकासाचा अमानवी रेटा आहे. सागरकिनाऱ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी भविष्यात आखण्यात येणाऱ्या धोरणांमध्ये ही संकटे दूर सारून एका नव्या विचारांचा स्विकार व्हावा ज्यामध्ये, संकटग्रस्त सागरी परिसंस्था आणि त्यामध्ये राहणाऱ्या जनसमुहांच्या उपजीविकेची सुरक्षा अशा दोन्ही उद्दिष्टांना एकत्र साध्य करता येईल.

**कार्यकक्षा १ बाबत शिफारस :** सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द करणे आणि उत्तम सागरकिनारा व्यवस्थापनासाठी उचित गोष्टींचा सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये समावेश करणे.

**कार्यकक्षा २ बाबत शिफारसी :** सागरकिनारा व्यवस्थापन कार्यक्रम-

- सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ बाबत होणाऱ्या नियमांच्या उल्लंघनावर लक्ष ठेवणे, त्यासाठी उपग्रहधारीत तंत्रज्ञानांचा वापर करुन प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाई अंमलात आणणे.
- सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसुचना, १९९१ मध्ये योग्य तो बदल आणून मच्छिमार समाज व त्यांच्या कुटूंबाचे अधिवास आणि उपजीविका यांना संरक्षण प्राप्त करुन देणे.
- स्थानिक परिस्थितीचा सर्वंकश विचार करुन मुंबईचा विकास आणि पुर्नविकासाची समस्या सोडविणे.
- समुद्रकिनाऱ्यांवरील बंदराची वाढती संख्या आणि त्यांच्या उभारणीमुळे समुद्रकिनाऱ्यांवर होणाऱ्या परिणामांची दखल घेऊन प्रतिबंधात्मक कारवाईचे नियम तयार करणे.
- समुद्र म्हणजे स्वस्तात सांडपाणी सोडून देण्याची जागा नव्हे हे मान्य करुन सांडपाणी प्रक्रियेची मानके अधिक प्रभावी करणे.
- आवश्यक चर्चाविमर्ष करुन अंदमान-निकोबार आणि लक्षद्विप बेटांसाठी नवीन व्यवस्थापन प्रणाली तयार करणे.
- काही नविन संरक्षण प्रणालींचा अवलंब करणे. उदा. अत्यंत असुरक्षित समुद्रकिनारे-मात्र हे करताना स्थानिक मच्छिमार कुटूंबांवर अशा संवर्धन प्रणालींचा काय परिणाम होईल याबाबत परिपूर्ण व काळजीपूर्वक विचार व्हावा.
- समुद्रकिनाऱ्यावरील खारफूटीच्या/तिवराच्या जंगलांची व्याख्या सुस्पष्ट करुन त्यांना संरक्षण पुरविणे.
- सागराच्या दिशेने असणारे सद्य आणि भविष्यातील धोके लक्षात घेऊन संरक्षक यंत्रणा उभारणे, मात्र हे करताना मच्छिमार समाजाच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेणे.
- सागरकिनाऱ्याबाबत सर्व बाजूंनी संशोधन आणि नियमन करता येईल अशा उपायोजना आखणे.
- समुद्राच्या पातळीत होणारी वाढ आणि असुरक्षित समुद्रकिनाऱ्यांचा धोका लक्षात घेऊन त्याचा सामना करता येईल अशा धोरणांची आखणी करणे.

# १. समितीचा कार्यकक्षा आणि कार्य

दिनांक १५ जून २००९ रोजी भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने प्राध्यापक एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली, सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मसुद्याबाबत पुढील योजना सूचविण्यासाठी चार सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या अन्य सदस्यांमध्ये, डॉ. शैलेश नायक, सचिव, मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सेस; श्री.जे. एम.माऊस्कर, ॲडिशनल-सेक्रेटरी, पर्यावरण आणि वन मंत्रालय आणि श्रीमती सुनिता नारायण, संचालक, सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट याचा समावेश होता. या समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली होती :

१. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र २००८ च्या मसुद्यावर मंत्रालयास प्राप्त झालेल्या सूचनांचे मुल्यमापन करणे.

२. एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनासाठी धोरण आणि कायदेशीर चौकट सूचविणे.

या समितीने MOEF CMZ च्या मसुद्यावर प्राप्त झालेल्या प्रतिक्रियांचे मुल्यांकन केले. समितीने पाच सभा घेतल्या ज्यामध्ये, CMZ वर प्रतिक्रिया नोंदविलेल्या विविध गटांच्या प्रतिनिधींचाही समावेश होता.

- २७ जून २००९- सागारकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ आणि सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ याबाबत चर्चा.
- ७ जुलै २००९- केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रतिनिधींबरोबर भेट.
- ८ जुलै २००९- चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या प्रतिनिधींबरोबर भेट.
- ११ जुलै २००९- संस्था व मच्छिमारांच्या संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर भेट.
- १६ जुलै २००९ - अंतिम रिपोर्ट तयार.

# २. परिचय : सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ ची पार्श्वभूमी

भारतीय सागरकिनाऱ्यांच्या संरक्षणाचे प्रयत्न ऐंशीच्या दशकात तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पुढाकाराने सुरु झाले. सन १९८१ मध्ये, श्रीमती इंदिरा गांधी यांनी समुद्रकिनारा लाभलेल्या सर्व राज्यसरकारांना सागरकिनारा क्षेत्रात विकास करताना घ्यावयाची प्रतिबंधात्मक काळजीबाबत सूचना पाठविल्या.त्या अनुषंगाने उचललेल्या पावलांचा परिणाम म्हणून वाळूच्या चौपाट्यांचे अत्यंत परिणामकारक संरक्षण होत असल्याचे आढळून आले. फेब्रुवारी १९९१ मध्ये भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने, समुद्रकिनाऱ्यांवरील विकास कामांवर देखरेख ठेवण्यासाठी पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना जारी करण्यात आली. **ही अधिसूचना इंग्रजीत सी. आर.झेड. नावाने प्रचलित आहे.**

सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ अतंर्गत सागरी लाटांच्या भरतीरेषेपासून ५०० मीटर जमिनीच्या दिशेकडील क्षेत्रांमध्ये आणि जमिनीच्या दिशेने भरतीचा प्रवाह आत शिरलेल्या खाडी, नदीमुख आणि उपसागर क्षेत्र इ.च्या भरतीरेषेपासून १०० ते १५० मीटर क्षेत्रामध्ये विशिष्ट विकासकामे किंवा गोष्टींना प्रतिबंध किंवा नियमन करण्यात आले आहे. या ५०० मीटर क्षेत्रातील जमिनीचा वापर करण्याबाबत चार प्रकारची वर्गवारी करण्यात आली आहे.

सागरकिनारा नियमन **क्षेत्र - एक** (पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील आणि भरती-ओहोटी दरम्यानचे क्षेत्र); सागरकिनारा नियमन **क्षेत्र-दोन** (नागरी किंवा विकसित क्षेत्र); सागरकिनारा नियमन **क्षेत्र-तीन** (ग्रामिण क्षेत्र) आणि सागरकिनारा नियमन **क्षेत्र-चार** (अंदमान व निकोबार आणि लक्षद्विप बेटे)

गेल्या १८ वर्षांत पर्यावरण आणि वन मंत्रालयाने या अधिसूचनेमध्ये २५ वेळा दुरुस्ती केल्या. सागरकिनारा नियमन क्षेत्राची अमंलबजावणीसुद्धा अनेकदा देशातील वेगवेगळ्या न्यायालयांच्या आदेशांच्या आधीन राहून होत गेली. दिनांक १८ एप्रिल १९९६ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार मंत्रालयाने राष्ट्रीय व राज्य पातळीवरील सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणांची स्थापना केली. पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत जारी करण्यात आलेल्या सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ च्या अमंलबजावणीसाठी अशा राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातील प्राधिकरणांची स्थापना करणे कायद्याने बंधनकारक होते. मात्र, या दरम्यान अधिसूचनेतील तरतूदींचेच मुल्यमापन करण्याची मागणी पुढे आली. असे सतत लक्षात येत गेले की सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेची अमंलबजावणी यशस्वीरित्या होऊ शकली नाही. या पार्श्वभूमीवर, सन २००४ मध्ये पर्यावरण आणि वन मंत्रालयाने प्राध्यापक एम.एस.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एका तज्ञ समितीची स्थापना केली. या समितीसमोर सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेचे मुल्यांकन करुन सागरकिनाऱ्यांबाबत ठोस कार्यक्रम सूचविण्याचे उद्दिष्ट होते. फेब्रुवारी २००५ मध्ये या समितीने पर्यावरण आणि वन मंत्रालयास आपला अहवाल सादर केला. या मध्ये, सागरकिनारा क्षेत्रात राहणाऱ्या जनसमुहांच्या उपजीविकेचे संरक्षण करावे आणि सागरकिनाऱ्यांचे संवर्धन करावे याबाबत ठोस सूचना होत्या. सदर सूचना पुढे देण्यात आल्या आहेत.

सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन : एम.एस.स्वामीनाथन रिपोर्ट, २००५ मधील मार्गदर्शक सूचना-

- आपल्या अन्न आणि उत्पन्नासाठी सागर संसाधनांवर अवलंबून असणाऱ्या मच्छिमार कुटुंबांचे अधिवास आणि उपजीविकेचे संरक्षण करणे तसेच, सागरकिनारी शेती करणाऱ्या समुहांना असलेल्या संभाव्य धोक्यांकडेही लक्ष देणे.
- रामसार क्षेत्र आणि ऑलिव्ह रिडले कासवांची प्रजनन क्षेत्रांसह सागरकिनारी असलेल्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा क्षेत्रांचे सवर्धन करणे.
- खारफुटी आणि बिगर-खारफुटी वनस्पतींचे आवरण तसेच जैवविविधता संवर्धनातून सागरीकिनाऱ्यांवरील पर्यावरणीय प्रबंधन अधिक सुरक्षित करणे.
- हवामान बदलामुळे समुद्राच्या पाण्यात होणारी वाढ, त्सुनामी लाटा आणि चक्रीवादळांचा तडाखा इ. संकटाचा सामना करण्याची क्षमता सागरकिनाऱ्यावर राहणाऱ्या जनसमुहात अधिक दृढ करणे.
- सागरी पाण्याचे प्रदूषण रोखणे जेणेकरुन स्थानिक बाजारात विकले जाणारे मासे आणि अन्य उत्पादने किंवा निर्याताची उत्पादने अबाधित राहतील. आणि यामुळे छोट्या-छोट्या मच्छिमार कुटुंबाचे उत्पन्न धोक्यात येणार नाही.
- सागरकिनारा क्षेत्रात राहणाऱ्या २५ कोटी लोकांचे जीव आणि उपजीविकांचे संरक्षण करण्यासाठी योजना आखणे तसेच मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, कोची, विशाखापट्टनम् इ. महानगरांना समुद्राच्या वाढत्या पातळीचा फटका बसू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे.
- उपरोक्त उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी सागरकिनारा आणि जमिनीकडील क्षेत्र यांचा एकत्रित विचार करुन लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

मे २००८ मध्ये मंत्रालयाने सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेचा मसुदा जाहीर केला, तसेच त्यामध्ये ग्रीन फिल्ड एअरपोर्ट क्षेत्राचा समावेश करण्याची दुरुस्तीही जोडली.

पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अनुसार हा मसुदा घोषित करण्यात येऊन तो जाहीर केलेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत त्यावर लोकांच्या सूचना आणि हरकती मागविण्यात आल्या. तामीळनाडू, गोवा राज्य सरकार आणि पाँडेचेरी येथिल प्रशासनाने केलेल्या विनंतीनुसार हा मसुदा दिनांक २२ जुलै २००८ रोजी पुर्नअधिसूचित कालावधी वाढविण्यात आला.

सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना यामधील काही फरक पुढीलप्रमाणे-

- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये नियमनाधारीत व्यवस्थापन अभिप्रेत आहे, तर सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये नियोजनातून व्यवस्थापनावर भर देण्यात आला आहे. तसेच, सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेत भरती आणि आहोटीदरमान्याचे क्षेत्र आणि भरतीरेषेपासून जमिनीच्या दिशेने ५०० मीटर पर्यंतच्या क्षेत्राचे

नियमन करण्यात आले आहे. यामध्ये ओहोटीमागील सागरी जलक्षेत्र समाविष्ट नाही. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंतर्गत समुद्राच्या दिशेने १२ नॉटीकल माईलपर्यंतचे क्षेत्र आणि जमिनीच्या दिशेने ग्रामपंचायत/महापालिका किंवा पर्यावरणीय सीमा, उदा. भरती-ओहोटीमुळे प्रभावित पाणथळ क्षेत्र आणि सागरी भागाचा समावेश करण्यात आला आहे.

- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंतर्गत संपूर्ण देशातील समुद्रकिनाऱ्यावर भरतीरेषेपासून जमिनीच्या दिशेने ५०० मीटरपर्यंत असलेल्या संपूर्ण क्षेत्रातील कारवायांचे नियमन केले जाते. हा नियम केवळ ५०० मीटरच्या मर्यादेपर्यंतच लागू असून त्यापलिकडील एखाद्या पर्यावरणीयदृष्ट्या अतिसंवेदनशील किंवा असुरक्षित क्षेत्र ज्यास ५०० मीटरच्याबाहेर असले तरी संरक्षणाची गरज आहे. त्याला लागू होत नाही.

- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये नियमनाचे क्षेत्र ठरविण्यासाठी **सेटबॅक लाईन** नावाची संकल्पना मांडली आहे. ही सेटबॅक लाईन त्या त्या सागरकिनाऱ्यांवरील असुरक्षित क्षेत्राची व्याख्या त्याभागातील किनाऱ्यांची उंची, भू-जैव परिस्थिती, समुद्राच्या पातळीच्या स्थितीबाबतचा अंदाज आणि समुद्रकिनाऱ्याची वृद्धी किंवा झीज यानुसार केली जाईल. थोडक्यात असे की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र ५०० मीटरपेक्षा कमी किंवा जास्त हे त्या त्या क्षेत्राच्या असुरक्षतेनुसार ठरते. ही सेटबॅक रेषा सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना घोषित केलेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या आत मंत्रालयाने नेमून दिलेल्या अधिकृत संस्थेने आखून द्यायची आहे.

- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये समुद्रकिनाऱ्याच्या संरक्षण आणि प्रतिबंधात्मक कारवाईसाठी चार भागात विभागणी करण्यात आली आहे. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र हीच विभागणी जवळजवळ सारखी असली तरी नियमनाच्या पद्धतीत बदल केला आहे. दोन्ही अधिसूचनेत **क्षेत्र-एक** म्हणजे पर्यावरणीदृष्ट्या अतिसंवेदनशील भाग ठरविण्यात आला आहे. यामध्ये फरक आहे तो असा की सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना **क्षेत्र-फरक** हे **ना-विकास क्षेत्र** असे मानण्यात येऊन अगदी मर्यादीत स्वरुपात काही गोष्टी या भागात करण्याची परवानगी अधिसूचनेत दुरुस्ती आणून मिळविण्यात आली आहे. परंतु, सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेत असे नसून **क्षेत्र-एक** मध्ये एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेनुसार ठरविण्यात येणाऱ्या अनेक गोष्टी करण्याची मुभा देण्यात आली आहे. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेतील **क्षेत्र-दोन** ह्या वर्गवारीतील नियमनाचे क्षेत्र भरतीरेषेपासून जमिनीच्या दिशेने ५०० मीटर असून नागरी आणि नगरपालिका हद्दिलाही ते बंधनकारक आहे. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये **क्षेत्र-दोन** या वर्गवारीमध्ये सर्वच नागरी आणि औद्योगिक क्षेत्र त्याचबरोबर काही विशेष लक्ष देण्याची गरज असलेल्या क्षेत्रांचा समावेश आहे. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना असलेला नागरी आणि ग्रामीण क्षेत्र असा फरक यामध्ये केलेला नाही. त्याचप्रमाणे, सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना असलेली ५०० मीटरची मर्यादा यामध्ये नसून संपूर्ण नगरपालिका किंवा महानगरपालिका क्षेत्र समाविष्ट करण्यात आले आहे. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेतील क्षेत्र-तीन मध्ये इतर सर्व मोकळ्या जागासंह समुद्रातील पाणी व भरती-ओहोटीमुळे जमिनीकडील प्रभावित क्षेत्र समाविष्ट केलेले आहे. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना आणि सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना या

दोन्हीमध्ये क्षेत्र-चार मध्ये अंदमान व निकोबार आणि लक्षद्विप बेटांचा समावेश आहेत. फरक इतकाच की सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमध्ये ५०० मीटरची नियमन क्षेत्र मर्यादा आहे आणि सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये संपूर्ण बेट एकात्मिक योजनेद्वारे व्यवस्थापन क्षेत्र मानण्यात आले आहे.

- सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-दोन आणि क्षेत्र-तीन यानुसार प्रतिबंधीत आणि परवानगी असलेल्या गोष्टींची यादी आहे, तसेच क्षेत्र-एक मध्ये अगदी मर्यादीत स्वरूपात विकासाला परवानगी आहे. (अधिक माहिती परिशिष्ट दोनमध्ये सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेतील परवानगी योग्य कामांची यादी या शिर्षकाखाली दिली आहे). सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये क्षेत्र-एक आणि क्षेत्र दोन च्या व्यवस्थापनासाठी एकात्मिक सागरकिनारा व्यवस्थापन योजना बनविण्याचे प्रयोजन आहे. सदर योजना तयार झाल्यावर ती केंद्र सरकारमार्फत मंजूर करुन घ्यावी लागते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सेटबॅक लाईन निश्चित केलेल्या क्षेत्रातील विकासाठी कामे सदर अधिसुचना लागू केल्या तारखेपासून त्या त्या क्षेत्राच्या नगररचना व नियोजनाच्या नियमांनुसार करण्याचे प्रयोजन आहे. याठिकाणी भरती रेषेपासून जमिनीच्या दिशेने ५०० मीटर प्रतिबंधीत क्षेत्राची अट नसून संपूर्ण नगरपालिका किंवा महानगरपालिका क्षेत्र व्यवस्थापना अंतर्गत समाविष्ट असेल. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमधील क्षेत्र-तीन मध्ये परवानगी असलेल्या कामांची यादी अधिसूचनेच्या परिशिष्ट सहामध्ये देण्यात आलेली आहे. या अधिसूचनेच्या परिशिष्ट चारमध्ये, विविध स्तरावर करण्यात येणाऱ्या कामांसाठी परवानगी देणाऱ्या यंत्रणेची माहिती देण्यात आली आहे. उदा. पारंपारिक पद्धतीने मासेमारी करण्याऱ्यांसाठी आवश्यक बर्फाचे कारखाने आणि भुगा बनविण्याची सोय करण्यासाठी आवश्यक परवानगी स्थानिक यंत्रणेकडून घेता येते. त्याचप्रमाणे, जेट्टी किंवा मच्छिमारीचे बंदर उभारण्यासाठी राज्यस्तरीय सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची परवानगी आवश्यक असते. याचप्रकारे एकात्मिक बंदर, जेट्टी किंवा जहाज बांधून ठेवण्याची जागा उभारण्यासाठी पर्यावरणीय परिणाम मुल्यमापन अहवाल प्राप्त झाल्यावर केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रलयाकडून घेता येते.

# ३. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या मसुद्यावरील प्रतिक्रिया

सदर अधिसूचना जारी करण्यात आल्यानंतर केंद्रिय पर्यावरण आणि वनमंत्रालयाकडे राज्य सरकारपासून ते मच्छिमार संघटनांपर्यंत वेगवेगळ्या संस्थांकडून मोठ्या प्रमाणात सूचना व हरकती प्राप्त झाल्या. यासाठी आवश्यक चर्चा देशभर घडवून आणण्यासाठी मंत्रालयाने अहमदाबाद स्थित पर्यावरण शिक्षण केंद्र या संस्थेची नेमणूक केली. पर्यावरण शिक्षण केंद्राने देशभर स्थानिक जनसमुह व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींबरोबर एकूण ३५ जन-परिसंवाद घडवून आणले. आणि त्यांचा एकत्रित अहवाल सप्टेंबर २००८ मध्ये मंत्रालयास सादर केला. दिनांक २७ जुन २००९ रोजी आयोजित केलेल्या समितीच्या पहिल्या सभेमध्ये या जन-परिसंवादाच्या अहवालातील ठळक मुद्दे पर्यावरण शिक्षण केंद्र संस्थेच्या संचालकांनी मांडले.

**पर्यावरण शिक्षण केंद्राने घेतलेल्या जन-परिसंवादांतील ठळक मुद्दे -**

- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना पुन्हा लागू करण्यात यावी तसेच त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी. त्याचप्रमाणे सेट बॅक लाईन, पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र, एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन आणि व्यवस्थापन पद्धती इ. संकल्पना अधिक स्पष्ट व्हाव्यात.
- जर परिणामकारक अंमलबजावणी आणि अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्यांना कडक शिक्षा अंमलात आणली तर काही सुधारणांसह सध्याची सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनास पुरेसा वाव आहे.
- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ ची निर्मिती प्रक्रिया आणि मसुदा बनविण्यात वेगवेगळ्या संबंधित संस्था-समुहांचा, विशेषतः स्थानिक समुहांचा सहभाग घेणे आवश्यक आहे.
- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मधील व्यवस्थापनाच्या पद्धतींमध्ये परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अर्थ लावण्याचा अभाव असून त्यांचा वापर व्यापारी हेतूने प्रेरीत गोष्टींना पुरस्कृत करण्यासाठी आणि कायदेशीर मान्यता मिळवून घेण्यासाठी होऊ शकतो.
- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ विशेष आर्थिक क्षेत्राचा पुरस्कार करील, त्यामुळे स्थानिक जनसमुहांच्या हक्कांना डावलत सागरकिनारा क्षेत्र आणि संसाधने उद्योगक्षेत्राला वापरण्यासाठी मुभा मिळेल.
- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या व्यवस्थापन पद्धती आणि रचनेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य सरकारची भूमिका नीट स्पष्ट होताना दिसत नाही. नियोजित सागारकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेच्या प्रक्रियेत स्थानिक जनसमुहांचे हक्क आणि पंचायत व्यवस्थेतील लोकप्रतिनिधींचा स्थानिक पर्यावरणाबद्दल नियोजन करण्याच्या कामात सहभाग घेण्यासाठी फारसा वाव ठेवण्यात आलेला नाही.
- सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ च्या मूळ उद्दिष्टांनाच हरताळ फासणाऱ्या काही दुरुस्त्यांकडे पाहता सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्येसुद्धा

अशा प्रकारे बदल आणि दुरुस्त्या आणण्याची दाट भीती आहे आणि त्याचा वाईट फटका मच्छिमार समाजाला बसण्याची शक्यता जास्त आहे.

- सागरकिनाऱ्यांवरील नैसर्गिक परिसंस्था आणि सागरकिनारी परंपरागत राहत आलेल्या जनसमुहांचे मुलभूत हक्क यांच्या संरक्षणाची हमी घेणारा सागरकिनारा व्यवस्थापनविषयक कायदा अस्तित्वात यावा. राज्य विधी मंडळातील लोकप्रतिनिधींनी सागरकिनाऱ्यांशी संबधीत विषयांवरील धोरणांवर सखोल चर्चा करुन या कायद्याची निर्मिती करावी. असा कायदा अस्तित्वात येईपर्यंत सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ कोणत्याही दुरुस्तीविना कठोरपणे अंमलात आणावा तसेच उल्लंघन करणाऱ्यांना कडक शिक्षा व्हावी.

सन २००८ मध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण आणि वने यावरील संसदीय समितीने सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मसुद्याचा अभ्यास केला. संसदीय समितीने याबाबत आपले मत मांडताना असे नमुद केले की, मंत्रालयाने संबधित संस्था समुहांचे विशेषतः मच्छिमार व सागरकिनारी स्थानिक जनसमुहांच्या हिताच्या आड येणाऱ्या प्रश्नांचा निकाल लावण्यापूर्वी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ ची अमंलबजावणी करण्याची घाई करु नये. या समितीने अशी शिफारस केली की जोपर्यंत सागरकिनारी स्थानिक जनसमुहांचा उचित सहभाग प्राप्त करुन देणारी कायदेशीर यंत्रणा अस्तित्वात येत नाही तोपर्यंत ही अधिसूचना तात्पुरती स्थगित करावी.

# ४. कार्यकक्षा १ : सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ बाबत मंत्रालयाकडे आलेल्या प्रतिक्रियांचे मुल्यांकन

सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ बाबत मंत्रालयाकडे आलेल्या लेखी प्रतिक्रियांचा अभ्यास केला. अगदी छोटा कार्यकाळ लाभला असतानाही समितीने याविषयी केंद्र सरकार, राज्य सरकार, सार्वजनिक क्षेत्र, खाजगी व्यापारक्षेत्र,मच्छिमार संघटना आणि पर्यावरणवादी संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा केली. (याबाबत परिशिष्ट तीनमध्ये आलेल्या प्रतिक्रियांचा सारांश आणि परिशिष्ट चारमध्ये सभेचा वृत्तांत मांडला आहे). याबाबत केलेले मुल्यांकन आणि चर्चा विमर्षातून पुढे आलेले ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे-

- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मसुद्याला सर्व ठिकाणाहून विरोध आहे. सर्व आठ राज्य सरकारांनी लेखी प्रतिक्रिया नोंदविताना सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मागे घेण्याची शिफारस केली. या अधिसूचनेच्या मसुद्याला मच्छिमार आणि पर्यावरणवादी संस्था-संघटनांनीसुद्धा विरोध केला आहे. इतकेच नव्हे तर बांधकाम व्यावसायिक व खाजगी क्षेत्रानेसुद्धा याच्या मसुद्याबाबत आक्षेप व्यक्त केले आहेत.

- या मसुद्यामध्ये मांडलेल्या शास्त्रीय व्यवस्थापनपद्धती म्हणजे सोयीचे अर्थ लावून स्वार्थ साधण्यासाठी मोकळीक निर्माण करीत आहे अशी सार्वत्रिक भावना आहे. यामध्ये वापरण्यात आलेल्या शास्त्रीय संज्ञा विशेषतः सेटबॅक लाईन ठरविणे याबाबत काही संदिग्धता आहे. सेटबॅक लाईनबद्दल तर सर्वच गटांमध्ये एकमत आहे की ती ठरविण्यात शास्त्रीय आणि माहितीच्या स्तरावर खूप दोष आहेत आणि त्यामुळे तिच्या अंमलबजावणीत दिरंगाई होऊ शकते. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८चे पुरस्कर्ते असणारे खाजगी विकासकसुद्धा या सेटबॅक लाईनचा त्यांना नक्की काय उपयोग होऊ शकतो याबाबत गोंधळात आहेत. त्याचबरोबर या मसुद्यामध्ये सातत्याचा अभाव आणि संज्ञाचे अर्थ किंवा प्रस्तावांबाबत अस्पष्टता आहे. यामुळे मसुद्यातील तरतुदींचे सोयीचे अर्थ लावले जाण्याची आणि व्यावहारीक अडचणींना सामोरे जावे लागण्याचीच शक्यता जास्त आहे. यामुळे एकंदर समुद्रकिनाऱ्यांनाच धोका उत्पन्न होण्याची शंका वाटते. याउलट चर्चांमधून असे लक्षात आले की ५०० मीटरच्या मर्यादेची सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेतील तरदूत काळाच्या आणि अनुभवांच्या पातळीवर अधिक स्विकारार्ह आहे.

- अशीही भीती व्यक्त होत आहे की मधल्या काळात ज्या काळात सेट बॅक लाईन आखण्यात येईल आणि एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना बनवून तिला क्रेंद्र सरकारकडून मान्यता मिळेल-त्याच काळात अधिसूचना उल्लंघनाचे अनेक प्रकार घडवून त्यांना योजनेअंतर्गत मान्यता मिळवून घेण्यासाठी काही लोक प्रयत्न करतील. देशातील मत्स्यउद्योगासाठी नोडल एजन्सी असलेल्या केंद्रिय कृषी मंत्रालयाने अशी विनंती केली आहे की अधिसूचना जारी करण्यापूर्वीच सेटबॅक लाईन आखून घेण्यात यावी. त्यापुढे जाऊन कृषी मंत्रालयाने असेही नमुद केले की सेटबॅक लाईनची व्याख्या संदिग्ध असून तिचा चूकीचा अर्थ लावला जाऊ शकतो.

- दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट मर्यादा क्षेत्राबद्दल आहे ज्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात व्यापारी कारवाया वाढतील आणि सागरकिनाऱ्यांवर शहरीकरण वाढेल. कर्नाटक आणि केरळ राज्य सरकारांनी अशी भीती व्यक्त केली आहे की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ चे उल्लंघन करुन उभारलेली कामे सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये नियमित करुन घेतली जातील. गोवा सरकानेही सध्याच्या उल्लंघनाच्या प्रकरणांवर कारवाई करण्यासाठी आवश्यक कायद्याची गरज व्यक्त केली आहे. महाराष्ट्र सरकारने असे मत दिले की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमुळे सागरकिनाऱ्यांवर व्यापारी हेतूने प्रेरीत गोष्टींना मोकळे रान मिळेल. ओरिसा सरकारने असे मत दिले की संवेदनशील पर्यावरणीय भागांमध्ये अनेक कारवायांना या अधिसूचनेमुळे मोकळीक मिळेल. हे वेगळे सांगण्याची गरज नाही की अशा कारणास्तव सर्व पर्यावरणावादी संस्था-संघटनांनी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ ला कडाडून विरोध केला आहे.

- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मसुद्यामध्ये मच्छिमार समाजाच्या उपजीविकेच्या हक्कांकडेही दुर्लक्ष करण्यात आले आहे. नॅशनल फिशवर्कर्स फोरमने असे म्हटले आहे की या अधिसूचनेमुळे स्थानिक जनसमुहांचा समुद्रावरील हक्क हिसकावून घेतला जाऊन विविध क्षेत्रातील व्यापारी व मोठ्या गुंतवणूकदारांचे हीत जपले जाईल. सरकारी आणि बिगर-सरकारी अशा दोन्ही संस्थांकडून हीच भावना व्यक्त करण्यात आली आहे. केरळ सरकारने स्पष्टपणे असे कळविले आहे की समुद्रावर मच्छिमार समुहांचा परंपरागत हक्क आहे आणि त्यांना त्यांच्या हक्काच्या घरापासून हिरावून घेतले जाऊ नये.

- पर्यावरण शिक्षण केंद्राने आयोजित केलेल्या जन-परिसंवादात सहभागी लोकांना स्थानिक भाषेत सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना विषयी साहित्य वाटले. मात्र, अधिसूचना या पद्धतीने लोकांसाठी कधीच उपलब्ध झाली नव्हती किंवा त्यावर सागरकिनाऱ्यावरील गावांमध्ये चर्चा घडवून आणण्यात आली नाही. अशीही भीती व्यक्त करण्यात आली की या अधिसूचनेद्वारे सूचविण्यात आलेले बदल लोकांच्या नीट लक्षात आलेले नाही किंवा समुद्रकिनारी राहणाऱ्या लोकांनी मोठ्या संख्येने यास विरोध केला आहे. त्यांनी सादर केलेल्या मागणीत असे स्पष्ट करण्यात आले की अधिसूचना घोषित करण्यापूर्वी त्यांचा सहभाग मिळविणे आवश्यक आहे.

- सध्या अस्तित्वात असलेल्या ३२ सदस्यांच्या राष्ट्रीय शाश्वत सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन मंडळावर अनेक संस्थांनी आपल्या प्रतिनिधीत्वाची मागणी केली.

- या अधिसूचनेविषयी अनेक संस्थांनी प्रश्न उपस्थित करण्याबरोबरच सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. असेही लक्षात आणून देण्यात आले आहे की सध्याच्या सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने अंतर्गत अंमलबजावणी यंत्रणा दुबळी असल्यामुळे उल्लंघनाची प्रकरणे अगदी सहज घडून येतात.

# ५. कार्यकक्षा १ : समितीच्या शिफारसी

समितीने पुढील चार पर्यायांवर सखोल विचार केला आहे.

- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ ची अंमलबजावणी सूरुच ठेवावी.
- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये आलेल्या सूचना आणि हरकतींचा समावेश करुन पुर्नरचित मसुदा जाहीर करावा.
- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द करणे आणि उत्तम सागरकिनारा व्यवस्थापनासाठी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये काही सूचविण्यात आलेल्या सुधारणा आणणे.
- सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द करुन सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ आणि सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८मधील ठळक वैशिष्ट्यांना एकत्रित करुन नविन अधिसूचना जाहीर करणे.

विविध पर्यायावर सखोल विचारविमर्ष केल्यानंतर समितीने दिनांक २७ जून २००९ च्या सभेमध्ये एकमताने तिसऱ्या पर्यायाची शिफारस म्हणून निवड केली.

**कार्यकक्षा १ बाबत शिफारस : सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द करणे आणि उत्तम सागरकिनारा व्यवस्थापनासाठी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये काही सूचविण्यात आलेल्या सुधारणा आणणे.**

# ६. कार्यकक्षा २ : एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनाकरिता धोरण व कायदेशीर चौकटीबद्दल सूचना,

समितीला असे  स्पष्टपणे वाटते की आज भारताचा समुद्रकिनारा दोन बाजूंनी असुरक्षित बनला आहे. एका बाजूला, समुद्रकिनाऱ्यांवर औद्योगिक आणि नगरविकासाचा वाढता दबाव आहे; आणि दुसऱ्या बाजूला, वातावरण बदलामुळे निर्माण होणारी चक्रीवादळे, महाकाय लाटांचे तडाखे आणि अलीकडच्या काळातील समुद्राच्या पातळीत होणारी वाढ यांचा धोका आहे. यामधून समुद्रकिनारा आणि त्यावर राहणाऱ्या लोकांच्या संरक्षणासाठी सदैव दक्ष राहण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच, समुद्रकिनारे म्हणजे मच्छिमार समाजाचे अधिवास आहेत. हा समाजदेखील दुहेरी संकटात आहे. एका बाजूला सागरी पर्यावरणाचे संवर्धन आणि दुसऱ्या बाजूला विकासाचा अमानवी रेटा आहे. सागरकिनाऱ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी भविष्यात आखण्यात येणाऱ्या धोरणांमध्ये ही संकटे दूर सारून एका नव्या विचारांचा स्वीकार व्हावा ज्यामध्ये, संकटग्रस्त सागरी परिसंस्था आणि त्यामध्ये राहणाऱ्या जनसमुहांच्या उपजीविकेची सुरक्षा अशा दोन्ही उद्दिष्टांना एकत्र साध्य करता येईल.

एका बाजूला सागरी संरक्षण उद्यान किंवा वनाच्छदीत बेटांसाठी याच जनसमुहांना त्यांच्या राहत्या वसतीस्थानापासून अलग पाडले जात आहे. दुसऱ्या बाजूला मोठे विकास प्रकल्प त्यांना आपल्या जमिनीवरुन विस्थापित करुन त्यांची उपजीवीका हिसकावून घेण्याचे संकट उभे करीत आहे. आज त्यांच्या जमिनी पर्यटन आणि उच्चभ्रू  गृहबांधणी प्रकल्पांकडून विकत घेतल्या जात आहे.

या समितीने केलेल्या चर्चाविमर्षात असे लक्षात आले की सागरकिनारा क्षेत्राशी निगडीत अनेक प्रश्न आहेत ज्याच्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. समितीला मिळालेला मर्यादीत कालावधी लक्षात घेता समितीने अशा प्रश्नांना या रिपोर्टमध्ये अधोरेखीत केले आहे, जेणेकरुन नंतर त्याबाबत पाठपुरावा करणे शक्य होऊ शकेल. या समितीने असे सूचविले आहे की शासनाने पुढाकार घेत काही परिसंवाद घेऊन सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये काही उचित बदल करावे.

# ७. भविष्यकालीन कार्यक्रम

समितीने खालील काही मुद्दे येत्या काळात लक्षात घेण्यासाठी अधोरेखीत केले आहेत.

**७.१ सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने मधील उल्लंघनाच्या कारवायांवर लक्ष ठेवण्यासाठी उपग्रहाधारीत तंत्रज्ञानाचा वापर करणारी यंत्रणा, अधिक सक्षम अमंलबजावणी यंत्रणा आणि कायद्यात आवश्यक वदल आणले जावे.**

सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये तक्रारीची दखल घेणारी पुरेशी व्यवस्था उपलब्ध नाही. अधिसूचनेत असे नमुद केले आहे : पर्यावरण आणि वन मंत्रालय आणि राज्य सरकार किंवा केद्राशासित प्रदेशातील प्रशासन आणि राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या पातळीवरील तत्सम यंत्रणा जी या कारणास्तव नेमली असेल ती या अधिसूचनेतील तरतूदींवर देखरेख आणि अंमलबजावणी करेल.

सन १९९३ मध्ये इंडियन काऊन्सिल फॉर एनव्हायरोलीगल ॲक्शनने सन्माननीय सर्वोच्च न्यायालयात सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनेबाबत एक याचिका दाखल केली. सन १९९६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार दिल्ली स्थित पर्यावरण आणि वन मंत्रालय सचिव प्रमुख असलेल्या राष्ट्रीय सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. त्याचप्रमाणे राज्य/केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण १३ सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणांची स्थापना करण्यात आली.

या प्राधिकरणांना पर्यावरण(संरक्षण) कायदा, १९८६ नुसार अधिसूचनेच्या उल्लंघनावर दंडात्मक कारवाईचे अधिकार देण्यात आले. पर्यावरण(संरक्षण) कायदा, २९८६ च्या कलम ५,१९ आणि १० नुसार उल्लंघनाच्या करावायांची चौकशी करणे, तक्रार दाखल करणे, तथ्य तपासणे आणि उल्लंघन करणारे किंवा प्रदूषण करणारे युनिट बंद करुन टाकण्यासारखी दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार देण्यात आले. अधिसूचनेच्या उल्लंघनांवर लक्ष ठेवण्यासाठी हे अधिकार आजवर वापरण्यात आले असले तरी त्यांना अधिक कठोर कारवाईसाठी बदलणे आवश्यक आहे.

सध्या सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ अंतर्गत येणाऱ्या प्रकल्पांची शहानिशा करणे व मंजुरी देणे. (५ कोटी रुपयांपेक्षा कमी गुंतवणूक असणारे प्रकल्प राज्य स्तरावर मंजूर केले जातात) आणि त्यापेक्षा अधिक गुंतवणूकीचे केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडे जातात. राज्य स्तरावरील प्राधिकरणाने सूचविलेल्या शिफारसींच्या आधारे केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालय निर्णय घेते. बंदर आणि जेट्टीसारख्या मोठ्या प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडे सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ प्रमाणे पर्यावरणीय आघात मुल्यमापन करुन घेण्यासाठी जावे लागते. ही प्रक्रिया अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

यासाठी समिती पुढील कृतीयोजना सूचवू इच्छिते:

७.१.१ उपग्रहाचा आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन सागरकिनाऱ्यांचे नकाशे तयार करणे आणि प्रत्यक्ष उल्लंघनाच्या घटनांवर नजर ठेवणे. अशी उपाययोजना सन्माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार गोवा सरकारने संपूर्ण सागरकिनाऱ्याचे नकाशे तयार करुन घेतले. समिती याबाबत असे सूचवित आहे की केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने संपूर्ण देशाच्या सागकिनाऱ्यांचे नकाशे बनवून घेत त्यामध्ये घडणाऱ्या बदलांची त्वरीत नोंद घेणारे तंत्रज्ञान विकसित करणे यासाठी राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम हाती घेणे.

**गोवा : उल्लंघनावर कारवाई**

सन १९९८ मध्ये गोवा फाऊंडेशन नावाच्या गोवा राज्यातील पर्यावरणीय स्वयंसेवी संस्थेने राज्यातील सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ बाबत होणाऱ्या उल्लंघनासंबधी एक याचिका (क्र.४२२/१९९८/क्र.९९/१९९९) दाखल केली. अधिसूचनेतील क्षेत्र-तीन नुसार निवासी आणि सागरकिनारी राहणाऱ्या ग्रामीण समुहांच्या उपजीविकेच्या उपयोगातील क्षेत्रात बांधकामाच्या कारवायांबाबत ही याचिका करण्यात आली होती.

याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की सन्माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार गोवा राज्य सरकाने मेसर्स रिमोट सेंसिग इनस्ट्रुमेंट या हेद्राबादमधील कंपनीवर सन १९९१ ते २००५ दरम्यानची उपग्रहाधारित माहिती गोळा करुन तिचे तत्कालीन विश्लेषण करुन अहवाल सादर करण्याची जबाबदारी होती. गोळा झालेल्या माहितीमध्ये असे दिसून आले की १९९१ ते २००५ पर्यंत बांधकामांमध्ये वाढ झाली आहे. त्यानंतर डि.जि.पी.ए.स मार्फत कलंगुट, कंडोलिम आणि बागा या गावांचे सविस्तर सर्वेक्षण करण्यात आले.

या सर्वेक्षणातून गोवा राज्य सरकारच्या असे लक्षात आले की सन १९९१ नंतर व भरतीपासून जमिनीच्या दिशेने २०० ते ५०० मीटर दरम्यान ४५५३ बांधकामे उभी राहिली असून ती सरळ-सरळ सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेचे उल्लंघन करणारी आहेत. याशिवाय भरती-ओहोटीने प्रभावित नदी क्षेत्राच्या किनाऱ्यांवर १०० मीटरच्या आत आणखी २२७२ बांधकामे अशा प्रकारे तरतूदींचे उल्लंघन करु उभी राहली आहेत. सन्माननीय मुंबई उच्च न्यायालयाने या उल्लंघन करणाऱ्यांवर अत्यंत कडक करावाई करण्याचे आदेश दिले. जून २००९ मध्ये, गोवा राज्य सरकारने केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडे सदर बांधकामे मान्यताप्राप्त करुन घेण्यासाठी परवानगी मागितली. याचा अर्थ सरळसरळ अनधिकृत बांधकामे अधिकृत करुन घेत भविष्यातही सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेचे उल्लंघन करण्यास प्रोत्साहनच दिल्यासारखा होतो. समितीला असे वाटते की केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने याबाबत अत्यंत सावध भूमिका घेऊन भविष्यात उल्लंघनाचे प्रकार कोणत्याही समुद्रकिनाऱ्यावर घडू नयेत असे पहावे.

७.१.२ समुद्रकिनाऱ्यावर कामांना मंजूरी देण्याबाबत विविध तरतूदींचा नीट विचार करुनच योग्य तो निर्णय घेण्याची गरज आहे. पर्यावरणाचे हित सांभाळण्यासाठी भरपूर परिश्रम, चिकाटी आणि कठोर भूमिका घ्यावी लागेल. बऱ्याचदा असे लक्षात येत आहे की राज्य शासनातील

सचिवांच्या अखत्यारीखाली राज्य स्तरावरील यंत्रणा समुद्रकिनारी उभे राहणाऱ्या प्रकल्पांना मंजूरी मिळवून घेण्यासाठी प्रयत्नशील असतात आणि सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने त्याची ज्यासाठी नेमणूक केली आहे त्या प्रतिबंधात्मक कामामध्ये त्यांचा फारच थोडा वेळ जात आहे. म्हणून या राज्यस्तरीय यंत्रणेची कामांची पद्धत बदलण्याची गरज आहे आणि सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ व पर्यावरणीय आघात मुल्यमापनाशी निगडीत प्रकल्प मंजुरीची प्रकरणे राज्य पर्यावरण मुल्यमापन समिती किंवा पर्यावरण विभागा मार्फत हाताळली जाऊ शकतील. राज्यातील सागरकिनारा नियमन क्षेत्र प्राधिकरणांची भूमिका प्रतिबंधात्मक नियंत्रण ठेवण्याचीच असली पाहिजे. जबाबदाऱ्यांच्या अशा विभागणीमुळे निर्णय प्रक्रिया आणि कामाची अंमलबजावणी अधिक प्रभावी होऊ शकेल. याचा अर्थ असा की सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेशी संबधित प्रकल्पांचे योग्य मुल्यांकन करणाऱ्या तज्ञांचा समावेश राज्य पर्यावरण मुल्यमापन समितीमध्ये असला पाहिजे.

७.१.३ राज्य सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या क्षमतांचा विशेषतः माहितीचे स्त्रोत अधिक बळकट करण्याची गरज आहे. सागरकिनारा नियमाखाली एक मुख्य समस्या ही आहे की निर्णयप्रक्रिया सुरळीत चालण्यासाठी आवश्यक शास्त्रशुद्ध माहितीचा अभाव होय. याबाबत काम पाहणाऱ्या केंद्र आणि राज्य स्तरावरील शास्त्रीय माहिती संकलन व विश्लेषण संस्थेची कमतरताच आहे. याकडे त्वरीत लक्ष देणे आवश्यक आहे.

७.१.४ सागरकिनारा नियमन क्षेत्र आणि पर्यावरणीय आघात मुल्यमापनाबाबत असलेल्या मंजुरीची प्रकरणे केवळ पर्यावरण आणि वन मंत्रालयच जाहीर करीत आहे. राज्यस्तरिय प्राधिकरण किंवा प्रशासन मात्र हे करताना दिसत नाही. समितीने अशी नोंद घेतली आहे की अलिकडेच केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने विविध राज्यस्तरीय यंत्रणांना पत्र पाठवून मंजुरीच्या प्रकरणातील सर्व माहिती जाहीर करण्यास सांगितली आहे. समिती पुन्हा एकदा याबाबत असे सूचवित आहे की याबाबतचे निर्देश त्वरीत अंमलात आणले जावे.

७.१.५ पर्यावरण(संरक्षण) कायदा १९८६ मध्ये कंम्प्लायन्स प्रक्रिया प्रभावी करणाच्या दृष्टीने बदल करण्यात यावे. सध्या, या कायद्याच्या कलम २१ आणि २२ नुसार उल्लंघनाचे कृत्य अदखलपात्र आणि जामीनपात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक कारवाईचा प्रभाव कमी होतो. उल्लंघन करणाऱ्यास आर्थिक शिक्षेची तरदूत जास्तीत जास्त फक्त एक लाख रुपये आहे, जी रक्कम अत्यंत थोडी असल्यामुळे उल्लंघन करणाऱ्यांना जरब बसू शकत नाही. समिती याबाबत असे सूचविले की कायद्यातील या तरतूदींचे मुल्यांकन करुन प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या दृष्टीने कायद्यात योग्य ते बदल आणावेत.

## ७.२ सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये दुरुस्ती करुन मच्छिमार कुटूंबाच्या अधिवासांना आणि उपजीविकेला संरक्षण प्राप्त करुन द्यावे.

७.२.१ सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-तीन मधील मच्छिमार समाजाच्या घरासंबधी शिफारस : अधिसूचनेतील क्षेत्र-तीन मधील मच्छिमार समाजाचा समावेश आहे. राहत्या जागांविषयी व्याख्या करण्यात आली आहे. क्षेत्र-तीननुसार भरतीरेषेपासून जमिनीच्या दिशेने

२०० मीटरपर्यंत ना-विकास क्षेत्र (नो डेव्हलपमेंट झोन) ठरविण्यात आले आहे. या क्षेत्रामध्ये कोणत्याही नविन बांधकामांना परवानगी नसून केवळ अस्तित्वात असलेल्या अधिकृत इमारतींची दुरुस्ती करण्याचीच परवानगी आहे. तीसुद्धा करताना सध्याच्या चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त होईल अशा दुरुस्तीला मान्यता मिळत नाही. याक्षेत्रामध्ये शेती, फळबाग, बगिचा, गुरे चारणे, क्रिडांगण आणि जंगलाची लागवड करायला परवानगी आहे. त्यापुढील २०० ते ५०० मीटरपर्यंतच्या क्षेत्रामध्ये मच्छिमारांची गावं किंवा गावठण असल्यास बांधकामांना किंवा पुर्नबांधकामांना परवानगी आहे. या क्षेत्रामध्ये स्थानिक समुहांसाठी पावसापासून बचाव करण्यासाठी छप्पर, सार्वजनिक शौचालये, पाणीपुरवठा, शाळा, दवाखाना, इ. बांधकामास परवानगी आहे.

राहत्या घरांच्या विकासकामांवरील प्रतिबंधाचा प्रश्न सन १९९१च्या चटई क्षेत्र निर्देशांकानुसार (एक अधिक वर दोन मजले चढविण्यापर्यंत किंवा ९ मीटर उंचीपर्यंत बांधकामाची मर्यादा) लक्षात घेऊन मच्छिमार समाजाच्या काही संघटनांनी मच्छिमारांच्या घरांच्या विकासाबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या कुटुंबाच्या वाढत्या संख्येनुसार चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून देण्याची मागणी ते करीत आहेत. ही मागणी रास्त वाटत असली तरी एक गोष्ट लक्षात ठेवालया हवी की त्यानंतर अशा किमती जागेचा वापर मच्छिमारांनी स्वतःसाठीच केला पाहिजे. समिती अशी शिफारस करीत आहे की सरकारने याबाबत सखोल विचार करुन क्षेत्र-तीनमध्ये चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून द्यावा, मात्र जागेची मालकी आणि वापर यावरील निर्बंध तयार करावे.

### ७.२.२ उपजीविकेशी संबधीत कामे समाविष्ट करणेबाबत समितीची शिफारस

मच्छिमारांच्या उपजिवेकेचे मुख्य साधन म्हणजे मच्छिमारी होय. मात्र सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमध्ये याविषयी संदिग्धता जास्त आहे. परिणामतः अनेक वेळा मच्छिमार समाज त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या गरजांकडे या अधिसूचनेत दुर्लक्ष झाल्याची खंत व्यक्त करतो. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना २००८ मध्ये याबद्दल तरतूद करण्यात येऊन समुद्रकिनाऱ्यांवर राहणाऱ्या मच्छिमारांना मच्छिमारी करणे व तत्सम कामांना बंधन असणार नाही. सध्या सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये मच्छिमारांच्या दैनंदिन जीवनातील विविध कामांचा उदा. मासे सुकविणे, लिलावाची जाागा, जाळं दुरुस्त करण्याची जागा इ. मच्छिमारांच्या व्यवसायाशी निगडीत कामांचा निःसंदिग्ध उल्लेख आढळत नाही. या गोष्टीचाही मच्छिमार समाजाच्या जीवनावर विपरीत परिणाम होत आहे.

समिती अशी शिफारस करीत आहे की या अधिसूचनेत मच्छिमारांच्या परवानगी योग्य विविध कामांची यादी समाविष्ट करुन त्यांना क्षेत्र-दोन व क्षेत्र-तीनमध्ये करु देण्यास मुभा असावी. मात्र ही यादी अत्यंत काळजीपूर्वक तयार करावी जेणेकरुन त्यांचा कोणी गैरवापर करणार नाही. उदा. माशांवर प्रकिया करु देणाच्या कामाचा उल्लेख या यादीत असावा मात्र या कामाची व्याप्ती जर मोठ्या प्रमाणात असली तर त्यामुळे सागरकिनाऱ्यावर प्रदूषण होऊ शकते तसेच त्याची मालकी अ-मच्छिमार समाजाकडे असू शकते.

सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-तीन (० ते 2०० मीटर)मध्ये मच्छिमारांना घरे बांधण्याची मुभा आहे. पण पर्यटनासारखी आर्थिक गोष्ट प्रतिबंधीत आहे. मच्छिमारांच्या

मालकी जागेत पर्यटनाशी निगडीत गोष्टींचा क्षेत्र-तीनमध्ये समावेश करण्याची मागणी सतत करण्यात येत आहे. ही मागणी जरी रास्त वाटली तरी कालांतराने पर्यटनाच्या वाढत्या परिणामांवर नियमन करणे कठीण होऊ शकते. समिती असे सूचवू इच्छिते कि जर ही मागणी अधिसूचनेत समाविष्ट करण्यात आली तर अत्यंत काळजीपूर्वक पद्धतीने तिचा समावेश करण्यात यावा.

### ७.२.३ मच्छिमार समाजाच्या हक्कांविषयी कायदेशीर तरतूदींबाबत शिफारसी

समितीने मच्छिमारांकडून त्यांचे विकसप्रकल्पांमुळे कशा पद्धतीने विस्थापन होत आहे, त्यांची उपजीविका संपुष्टात येत आहे याविषयी कैफियत ऐकली आहे. उदा. मुंबईतील वर्सोवा, आंध्र प्रदेशातील मच्छलीपट्टनम् आणि गुजरातमधील मुंदरा अशा सागरकिनाऱ्यांवरील मच्छिमारांच्या जागी निवासी इमारतींपासून ते बंदर उभारणीपर्यंत विविध मोठ्या विकासप्रकल्पांनी कशा प्रकारे अतिक्रमण केले आहे. मच्छिमारांनी मोठ-मोठ्या कंपन्या आणि बिल्डरांविरोधात चालविलेल्या लढ्याची कहाणीच समितीसमोर मांडली.

समिती, प्राध्यापक एम.एस.स्वामिनाथन यांनी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेबाबत मुल्यमापन करणाऱ्या संसदीयसमितीसमोर मांडलेल्या शिफारशीला मान्यता देऊ इच्छिते की पारंपारिक जंगलनिवासी कायदा, २००६ प्रमाणेच पारंपरिक मच्छिमार समाजासाठी केंद्र पातळीवर कायदा करण्यात यावा.

**७.३** मुंबईतील विकास आणि पुर्नविकासाशी निगडीत प्रश्नांबाबत स्थानिक पातळीवरील दुरुस्त्या सूचविणे सागारकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-दोन मध्ये अस्तित्वात असलेल्या रस्त्यांलगत इमारतींना परवानगी आहे. ज्या इमारती १९ फेब्रुवारी १९९१ या तारखे पूर्वीपासून अस्तित्वात आहेत, त्यांनाच अधिकृत मानण्यात आले आहे. सदर तरदूत ५०० मीटरच्या मर्यादेतील विकासकामांवर नियमन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, परंतु तिचा अर्थ कायम वेगवेगळा लावण्यात आल्यामुळे तिची अंमलबजावणीही कठीण होऊन बसली आहे. त्यामुळे न्यायालयात असंख्य प्रमाणात खटले दाखल झाले आहेत. अनेकांचे अजून निकाल लागणे बाकी आहे. मुंबईत हा प्रश्न शीगेला जाऊन पोहोचला आहे, कारण मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यांवरील जमिनीचे भाव गगनाला भिडलेले आहेत आणि अशा जमिनींवर झोपडपट्ट्यांमधून मोठ्या संख्येने लोक राहत आहेत.

समितीने, झोपडट्ट्यांच्या तसेच मोडकळीस आलेल्या इमारतींचे मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पुर्नवसन करण्याबाबत बांधकाम व्यावसायिक संघटना, स्वंयसेवी संस्था आणि राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. चर्चेदरम्यान असे लक्षात आणून देण्यात आले की लोक ५०० मीटर हद्दीच्या आत अगदी समुद्राच्या जवळ राहत आहेत. असे म्हणण्यात येत की मुंबईतील समुद्रकिनाऱ्यांवरील ५०० मीटर क्षेत्रातील विकास किंवा पुर्नविकासाचा प्रश्न चटई क्षेत्र निर्देशांकाशी निगडीत आहे. जो सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेनुसार २ फेब्रुवारी १९९१ रोजी अस्तित्वात होता तेवढाच असला पाहिजे. यानुसार पाहिले तर बांधकाम व्यावसायिकांना पुर्नबांधणी प्रकल्पात चटई क्षेत्र निर्देशांकाचा फायदा मिळत नाही. स्वयंसेवी संस्थांनी सन १९४० पूर्वीच्या इमारतींचा पश्न पुढे आणला, ज्या अत्यंत वाईट

परिस्थितीत उभ्या असून तेथिल नागरिकांचे स्वास्थही धोक्यात आहे.

समितीला अशी माहिती देण्यात आली की चटई क्षेत्र निर्देशांकाचा प्रश्न सन्माननीय मुंबई उच्च न्यायालयात चर्चेला आला आहे. शहरातील एका बांधकाम व्यावसायिकाने दाखल केलेल्या याचिकेत (क्रमांक १०१९/१९९९) सन्माननीय उच्च न्यायालयाने अस्तित्वात असलेला चटई क्षेत्र निर्देशांक (एक्झिस्टींग फ्लोर स्पेस इंडेक्स) या शब्दाचा अर्थ सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये १९ फेब्रुवारी १९९१ च्या तारखेला अस्तित्वात असलेला चटई क्षेत्र निर्देशांक असाच मान्य केला आहे. या स्पष्टीकरणानुसार सध्याच्या चटई क्षेत्र निर्देशांक ग्रामीण भागात १.०० आणि मुंबईच्या शहरी भागात १.३३ असा आहे.

समितीला अशीही माहिती पुरविण्यात आली की मंत्रालयाने मे २००० मध्ये एका समितीची स्थापना केली आहे जी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेनुसार घोषित क्षेत्रात वसलेल्या झोपडपट्ट्या, अत्यंत वाईट परिस्थतीत उभ्या असलेल्या इमारतींच्या प्रश्नांचा अभ्यास करीत आहे. माजी केंद्रिय शहर विकास विभाग सचिव श्री. द.म.सुखटनकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या समितीने असे मत व्यक्त केले आहे की चटई क्षेत्र निर्देशांकात वाढ करण्यात यावी. या समितीने अशी शिफारस केली आहे की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये नमुद केलेल्या क्षेत्राबाहेरील क्षेत्राला लागू असलेला चटई क्षेत्र निर्देशांक जो विकास नियंत्रण नियमावलीनुसार (डेव्हलपमेंट कंट्रोल रुल) ठरतो तोच अधिसूचनेतील नमुद क्षेत्राला लागू करण्यात यावा. मंत्रालयाने सन्माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश प्रमाण मानून सुखटनकर समितीच्या अहवालातील शिफारसी स्विकारल्या नाही.

समितीने शहरातील विकासक आणि प्रशासकांना चटई क्षेत्र निर्देशांकात बदल आणण्याबद्दल विचारले असता बांधकाम व्यावसायिकांनी प्रकल्प आर्थिकदृष्ट्या परवडावा म्हणून केवळ ज्यादा नव्हे तर अमर्यादीत चटई क्षेत्र निर्देशांकाची मागणी केली. त्यांनी असे मत मांडले की आज समुद्रकिनाऱ्यांवर अत्यंत वाईट अवस्थेत जगणाऱ्यांना त्याच ठिकाणी फुकट घरे बांधून द्यावी आणि हे शक्य होण्यासाठी काही घरे ज्यादा बांधून ती विकून खर्च वसूल करण्यात यावा.

समितीने मच्छिमार समाजाच्या प्रतिनिधींकडून असेही ऐकले की झोपडपट्टी पुर्नविकास योजनांचा त्यांना काही फायदा नाही. त्यांनी पुढे असे स्पष्टीकरण दिले की झोपडपट्टी किंवा वाईट अवस्थेतील इमारतींचा पुर्नविकास करताना स्थानिक लोकांना प्राधान्य दिले जात नाही. पुर्नविकासाच्या नावावर ताब्यात घेतलेले क्षेत्र, विशेषतः समुद्राच्या दिशेने असलेला भाग जो या स्थानिक लोकांच्या मालकीचा असतो तो ताब्यात घेऊन प्रचंड किंमतीत विकण्यात येतो. मात्र, मच्छिमारांसाठी राखून ठेवलेला भाग अतिशय छोटा असतो. त्यांनी समितीकडे अशी मागणी केली की त्यांच्या जमिनीवरील झोपडपट्टी पुर्नविकासाचे सर्व प्रकल्प रोखण्यात यावे आणि केवळ मच्छिमारांची जमिनीवरील मालकी अबाधित ठेवणारे प्रकल्प मंजूर करण्यात यावे. समिती मुंबई शहर आणि त्यामधील अस्तित्वात असलेल्या मालमत्तेच्या पुर्नविकासाच्या गरजेला स्पेशल केस म्हणून नमुद करु इच्छिते.

मात्र, पुर्नविकासाचे हे कार्य सागरकिनाऱ्यांच्या संरक्षणाच्या नियमांचा बळी न देता कसे

साध्य करता येईल याविषयी स्पष्टता येत नाही. इतर भागातील सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-दोन मध्ये पुर्नविकासाच्या प्रश्नाबाबत समिती असे सूचविते की सरकारने या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करावा, कदाचित काही विशिष्ट भागात विशिष्ट प्रकारच्या इमारतींच्या पुर्नविकासाच्या परवानगीवर प्रतिबंध ठेवावा.

त्याचप्रमाणे, राज्य शासनाने सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमधील क्षेत्रात खाजगी विकासकांना इमारत बांधणीचे प्रकल्प राबवू देण्याच्या धोरणाचा पुर्नविचार करणे अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकल्पांमध्ये सरकारी गुंवणूकीचा निश्चित विचार व्हावा जेणेकरुन अशा पुर्नविकासात त्या ठिकाणाच्या कुटुंबाची गरज पूर्ण करण्याबरोबरच पर्यावरणीय सुरक्षाही जपली जाऊ शकेल.

## ७.४ समुद्रकनाऱ्यांवर उभ्या राहणाऱ्या बंदराची वाढती संख्या आणि त्यामुळे समुद्रकिनाऱ्यांवर होणारा परिणाम याबाबत व्यवस्थापन करण्यासाठी नियमांची शिफारस

समितीच्या असे लक्षात आले की सध्या देशातील सागकिनाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत व त्यास असंख्य बंदर आणि जेट्टींची निर्मिती कारणीभूत आहे. बंदर उभारणी प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात समुद्रात ड्रेजिंग करणे, किनारा बांधून काढणे, लाटांचे मार्ग बदलणे व समुद्रात भराव टाकणे चालते. समस्या अशी आहे की या प्रकल्पांचा एकत्रित परिणाम समुद्रकिनाऱ्यांवर काय होत आहे याविषयी अत्यंत त्रोटक माहिती असते. जहाजउद्योग मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी असे स्पष्टीकरण दिले की बंदरांची मालकी, त्यांचे आकारमान यानुसार त्यांना परवानगी दिल्यामुळे सर्वच बंदर निर्मिती प्रकल्पांवर नियंत्रण ठेवणे कठीण आहे. केंद्रिय जहाजउद्योग मंत्रालयामार्फत सार्वजनिक क्षेत्रातील बंदराची निर्मिती केली जात असून छोट्या बंदरांना राज्य सरकारकडून परवानगी मिळते. त्याचबरोबर खाजगी विकासकांमार्फतही काही बंदराचा विकास करण्यात येतो. तज्ञांचे यावर मात्र एकमत आहे की बंदरामुळे नजिकच्या समुद्रकिनाऱ्यावर विशेषतः वाळूच्या चौपाट्यांवर परिणाम होतो. यापूर्वीच अनेक बंदरांमुळे मोठ्या प्रमाणात समुद्रकिनाऱ्यांच्या रचनेत बदल झाले आहेत. ते आपल्याला एन्नोर, पुडूचेरी, अलिबाग, दिघा आणि दहेज येथे पाहता येतात.

त्याचप्रमाणे असेही लक्षात आले आहे की खाणकाम प्रकल्पांचाही समुद्रकिनाऱ्यांवर विपरीत परिणाम होत आहे. त्याचबरोबर किनाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या संरक्षक बांधकाम रचनेचाही समुद्रकिनाऱ्यांवर वाईटच परिणाम होत आहे.

**सागराची कोंडी**

सागरकिनाऱ्यांची धूप ही पुडूचेरीमधील एक मोठी समस्या आहे. मात्र येथिल वाळूच्या चौपाट्या काही एका रात्रीत गायब झालेल्या नाहीत. कार्यकर्ते सांगतात की ही समस्या सन १९८९ पासून निर्माण व्हायला सुरुवात झाली ज्यावेळेस इथल्या दक्षिण टोकावर बंदर बांधण्यात आले. लाटांचा प्रवाह रोखण्यासाठी दोन ब्रेकवॉटर बांधल्यामुळे समुद्रकिनाऱ्यावरील लाटांचे नैसर्गिक वहन आणि वाळूची दक्षिणोत्तर हालचाल खंडित झाली.

देशाच्या पूर्व सागरकिनाऱ्याजवळ सागरी लाटांचे वहन जास्त आहे, ज्यामुळे अंदाजे ६ दशलक्ष क्युबिक मीटर वाळू दक्षिणोत्तर दिशेने सरकत राहते. पुडूचेरीच्या दक्षिणेतील ब्रेकवॉटरमुळे वाळूचे दक्षिणेकडून उत्तरेकडे सरकणे बंद झाले आणि उत्तरेकडील ब्रेकवॉटर जवळील वाळूची चौपाटीच नष्ट झाली.

नवी दिल्ली स्थित सल्लागार तज्ज्ञ इंजिनिअरींग कंपनीला ही समस्या उद्‌भवेल याची आधीच कल्पना होती. त्यांनी वाळूला बाजूने वाहून जाण्यासाठी बायपास यंत्रणा बंदराच्या उभारणी दरम्यान बांधली होती. बंदरात जमा होणारी वाळू उपसून बाजूला टाकायची व समुद्रातील धूप थांबवायची अशी त्यांची योजना होती. सेंट्रल वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशन (सी.डब्ल्यु.पी.आर.एस) चे मुख्य संशोधन अधिकारी, श्री.एम.डी.कुदळे यांच्या मते, वाळूला बाजूने सरकवण्यासाठी जी बायपास यंत्रणा उभारली ती सन २००० ते २००१ एवढ्या अल्पकाळापुरतीच वापरण्यात आली आणि तेवढ्यापुरती वाळूची चौपाटी दिसली. पण नंतर सन २००२ मध्ये ही यंत्रणा बंद करुन टाकल्यामुळे चौपाट्या पुन्हा नाहिशा व्हायला सुरुवात झाली.

**वाळूचा नाश**

सन २००२ पर्यंत उत्तर पुडूचेरीच्या किनाऱ्यावरील सर्व वाळू संपुष्टात आली. समुद्रकिनाऱ्यांवरील इमारतींचा त्यामुळे पाया खचू लागला इतपत पाणी आत आले सन २००२-०३ मध्ये राज्य सरकारने जवळजवळ सात किलोमीटर लांब दगडी भिंत समुद्रकिनाऱ्यावर बांधायचे ठरविले. बांधकामावर ४० कोटी रुपये खर्च झाले. त्यामुळे पुडूचेरीच्या किनाऱ्याचे तात्पुरते रक्षण झाले तरी समुद्रकिनाऱ्याची धूप होण्याची ही समस्या तामीळनाडूच्या उत्तरेकडील गावांच्या किनाऱ्याने सरकली.

सन २००६ मध्ये पुडूचेरीच्या उत्तरकडे २०० मीटर चौपाटी नष्ट झाली. आत आलेल्या समुद्राने किनाऱ्यावरील घरे उध्वस्त करीत एका मुलाचा बळी घेतला. तामीळनाडू सरकारला या गावांच्या रक्षणार्थ संरक्षक भिंत बांधणे भाग पडले.

दरम्यान, सन २००२ मध्ये इंडियन इन्सटीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एन.आय.आय.टी) यांनी पुडूचेरी जवळ प्रयोगिक तत्वावर ग्रायन्स बांधून पहावे असे सूचविले. इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज आणि सिटीजन्स फोरम फॉर पुडेचेरी या संस्थांनी असे करण्यास आक्षेप घेतला. त्यांचे म्हणणे होते की ग्रायन्स बांधूनही ब्रेकवॉटर प्रमाणेच परिस्थिती निर्माण होईल आणि किनाऱ्यांची धूप होण्याची समस्या बांधकामाच्या उत्तरेकडे सरकेल. सन २००२ मध्ये केंद्रशासित प्रदेशाच्या विधीमंडळात हा प्रश्न उपस्थित झाला. सरकारने त्यावेळी आश्वासन

दिले की यावर इतरांचेही मार्गदर्शन घेण्यात येईल. जानेवारी २००८ मध्ये पाँडीकॅन व कोस्टल ॲक्शन नेटवर्क नावाच्या आणखी एका संस्थेने सन्माननीय चेन्नई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करीत न्यायालयाला किनाऱ्यावर चाललेले बांधकाम रोखण्याची विनंती केली. एक महिन्यानंतर न्यायालयाने सार्वजनिक बांधकाम विभागास निर्देश दिले की त्यांनी यासाठी पर्यावरणीय मंजुरी प्राप्त करावी. फेब्रुवारी २००८ मध्ये विभागाने सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना अंतर्गत मंजुरीसाठी अर्ज केला. दरम्यान, जानेवारी २००९ मध्ये, तामीळनाडू सरकारने विल्लुपूरम जिल्ह्यातील कोट्टपुप्पम ब्लॉकमधील समुद्रकिनाऱ्याची धूप होण्याप्रकरणी चौकशी सुरु केली. या चौकशीच्या अहवालात असे नमुद केले आहे की समुद्रात बांधण्यात आलेल्या भिंती/ग्रायन्समुळे समुद्रातील वाळूचे नैसर्गिक वहन खंडित झाले असून त्यामुळे होणाऱ्या किनाऱ्यांची धूप ही कोट्टकुप्पम ब्लॅक आणि पुडूचेरीच्या उत्तरेकडील विल्लुपुरमच्या वन्नूर तालुक्यातील सर्व गावांना धोकादायक ठरू शकते. या अहवालात पुढे असेही नमुद केले आहे की जर हे बांधकाम असेच चालू राहिले तर तामीळनाडूच्या समुद्रकिनाऱ्यावर विशेषतः विल्लुपूरम जिल्ह्यात समुद्रकिनाऱ्याची धूप होण्याची समस्या अधिकच गंभीर होऊ शकते. पुडूचेरी प्रशासनाने केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडे मंजुरीसाठी सादर केलेला प्रस्ताव प्रलंबित असून तामीळनाडू सरकारने अजून कोणताही प्रस्ताव सादर केलेला नाही.

सध्याच्या सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ आणि पर्यावरणीय आघात मुल्यमापन अधिसूचनेनुसार बऱ्याच बंदराचे प्रकल्प नियमन केले गेले आहे. कार्गोची क्षमता असलेल्या बंदरांना तर ही मंजुरी आवश्यकच आहे. याचा दुसरा अर्थ असा की अशी बंदरे जी केवळ गाळ उपसणे किंवा उपसलेल्या गाळाची विल्हेवाट लावण्यासाठी आहेत त्यांना ही मंजुरी आवश्यक नाही. पर्यावरणीय आघात मुल्यमापन अधिसूचनेमध्ये मंजुरीची आवश्यकता ही बंदराच्या क्षमतेनुसार करण्यात येणाऱ्या वर्गवारीवर अवलंबून आहे-ज्या बंदरांवर ५ दशलक्ष टनांपेक्षा जास्त माल हाताळण्याची क्षमता आहे त्यांना केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडून मंजुरी घ्यावी लागते, आणि इतरांना राज्य पर्यावरण मुल्यमापन प्राधिकरणाकडून मंजुरी घ्यावी लागते, आणि इतरांना राज्य पर्यावरण मुल्यमापन प्राधिकरणाकडून मंजुरी घ्यावी लागते. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना १९९१ नुसार सर्वच बंदरांना केंद्र सरकारकडून मंजुरी घ्याची लागते मात्र केवळ सर्वच बंदरांना केंद्र सरकारकडून मंजुरी घ्यावी लागते मात्र केवळ भरतीरेषेपासून जमिनीच्या दिशेने ५०० मीटर जमिनीच्या क्षेत्रापुरताचा हा संबध असतो आणि समुद्राच्या पाण्याबाबत ही अधिसूचना लागू पडत नाही.

समितीला असे वाटते की या पद्धतीचा विकास हा समुद्रकिनाऱ्यांसाठी हितावह नाही, विशेषतः वाळूच्या चौपाट्यांना नष्ट होण्याचा कायम धोका असून असे बदल आपल्याला दिसू शकतात. केंद्र आणि राज्य सरकारांमार्फत राबविण्यात येणाऱ्या बंदर उभारणी प्रकल्पांकडे पाहता त्यामुळे समुद्रकिनाऱ्यांची धूप होऊन कधीही भरुन न निघणारे नुकसान आहे.

समिती याबााबत पुढील शिफारसी सूचवित आहे-

७.४.१ सरकारने प्रत्येक बंदर प्रकल्पांमुळे समुद्रकिनाऱ्यांवर काय परिणाम होत आहे याचा त्वरीत अभ्यास करुन घेणे. नविन प्रकल्प किंवा सध्याच्या बंदराच्या विस्ताराचे प्रकल्प प्रलंबित असल्यास त्यांना तात्पुरती स्थगिती द्यावी.

७.२.२ सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये समुद्राकडील क्षेत्राचाही समावेश करावा कारण बंदरासारख्या प्रकल्पांमुळे समुद्रावर होणारे परिणाम आणि समुद्र व जमिनीदरम्यानच्या पर्यावरणाचीही परिणामांची दखल घेता येईल. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये बंदराच्या या कामांचे नियमन करण्याचा प्रयत्न केला होता, ज्यामध्ये अगदी रस्ते वाहतूकीशी संबधीत गोष्टींचाही समावेश करीत एकात्मिक बंदर व्यवस्थापनाचा विचार मांडला होता. या सुचनेचा समावेश सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये करण्यात यावा.

७.४.३ पर्यावरणीय आघात मुल्यमापन अधिसूचनेतील ९ जानेवारी २००९ च्या दुरुस्तीमध्ये असा मुद्दा घालण्यात यावा की बंदर विकासाच्या आधुनिकीकरणाऱ्या किंवा विस्ताराचा प्रस्ताव कोणतेही प्रदूषण होणार नसेल किंवा कोणत्याही प्रकारे जादा प्रमाणात पाणी वापरण्यात येणार नसेल किंचा विस्ताराचा प्रस्ताव कोणतेही प्रदूषण होणार नसेल किंवा जादा जमिन ताब्यात घेण्यात येणार नसेल किंवा जादा जमिन ताब्यात घेण्यात येणार नसेल तर त्यास पर्यावरण मंजुरीपासून सवलत देण्यात यावी. समिती असे सूचवित आहे की सदर दुरुस्ती सरकारने आपल्या परिक्षणाखालून गेल्यावरच करावी, जेणेकरुन उपरोक्त शिफारसींचा त्यामध्ये विचार होईल.

**७.५** समुद्र म्हणजे जमिनीवरची घाण स्वस्तात सोडून देण्याचा पर्याय नाही, या तत्वानुसार सांडपाण्याच्या प्रक्रियेचे निकष अधिक कठोर करण्याबाबत शिफारस समितीचे असे स्पष्ट म्हणणे आहे की प्रदूषणाचा समुद्रकिनाऱ्यांना मोठा धोका आहे. समुद्रामध्ये सांडपाणी व मैला सोडल्यामुळे अनेक ठिकाणच्या समुद्रातील मत्स्यसंसाधनावर गंभीर परिणाम होत आहे, असे सादरीकरण मच्छिमार समाजाने समितिसमोर मांडले. सांडपाणी व मैला समुद्रात सोडण्याबद्दलच्या दुबळ्या निकषांचा गैरफायदा घेत काही उद्योग समुद्रकिनारीच आपले बस्तान बसवित आहेत. सांडपाणी प्रक्रिया केंद्रापासून थेट समुद्रात पाईपलाईनमधून सांडपाणी व मैला प्रक्रिया करुन समुद्रात जात आहे किंवा नाही यावर नियंत्रण राखणे अशक्य आहे. त्याचप्रमाणे, बहुतेक शहर आणि महानगरपालिका ज्या समुद्रकिनारी वसल्या आहेत त्यांच्याकडून प्रक्रिया व करता सांडपाणी व मैला समुद्रात सोडण्याचे प्रकार होताना दिसत आहेत. समुद्र आणि किनारे घनकचरा टाकण्याचेही सोयीस्कर क्षेत्र बनविल्याचे चित्र दिसत आहे.

सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये नमुद क्षेत्रात शहर किंवा नगर आणि अन्य मानवी वस्ती, कारखाने यांनी वे मैला सोडणे प्रतिबंधीत आहे. विशिष्ट ठरवून घेतलेल्या कालावधीत त्यांनी अशा प्रकारे घाण समुद्रात सोडण्याचे प्रकार कायमचे थांबविले पाहिजेत आणि हा कालावधी तीन वर्षांपेक्षा जास्त असू नये. या तरतूदीला पूर्णतः धाब्यावर बसवून समुद्रात घाण सोडण्याचे प्रकार सर्वच शहरांमध्ये होताना दिसतात. पाण्याखालून पाईपलाईनमार्फत मैला समुद्रात सोडण्याचा प्रकार सागरी जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे.

समिती अत्यंत जाणिवपूर्वक अशी शिफारस करीत आहे की समुद्रातील प्रदूषण रोखण्यासाठी प्रभावी कृती करणे आवश्यक आहे. समुद्रात सांडपाणी सोडविण्याविषयीचे निकष सुधारण्यात यावे असे समिती सूचवित आहे. सागारिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ नुसार पाण्याखालून पाईपद्वारे सांडपाणी व मैला समुद्रात सोडण्यास परवानगी देऊ नये.

## ७.६ पुर्ण चर्चाविमर्ष करुन अंदमान व निकोबार आणि लक्षद्विप बेटांसाठी नविन व्यवस्थापना यंत्रणा लागू करणे

समितीच्या असे लक्षात आले की सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये या बेटांसाठी एक सलग ५०० मीटर क्षेत्राची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद बेटांच्या आकार आणि स्थानानुसार अडचणीची ठरत आहे. जर बेट लहान असेल तर संपूर्ण बेटाला सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना लागू करावा लागेल, आणि जर अशी स्थिती असेल आणि त्या बेटासाठी व्यवस्थापन योजना तयार नसेल तर बेटावर राहणाऱ्या लोकांचे जीणे मुश्किल होईल. याउलट, एखादे बेट आकाराने मोठे आहे तर बेटावरील अनेक पर्यावरणीदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र ५०० मीटर क्षेत्रार येतच नाहीत अशीही स्थिती आहे. आणखी एका महत्त्वाच्या कारणास्तव या बेटांकडे पाहिले जावे ते म्हणजे समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे वाढलेली असुरक्षितता होय. या प्रश्नांची उकल करण्यासाठी सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ चे मुल्यमापन आवश्यक आहे. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये असे नमुद करण्यात आले होते की या बेटांचा विकास एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेअंतर्गत व्हावा, ज्याची मंजुरी केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडून मिळवावी लागते. समितीला अशी माहिती मिळाली आहे की काही बेटांसाठी अशा व्यवस्थापन योजना यापूर्वीच बनविण्यात आल्या असून ती मंजुरीही मिळाली आहे.

समिती अशी शिफारस करीत आहे की या बेटांवरील एकात्मिक व्यवस्थापनाच्या दृष्टीने स्वतंत्रपणे **द्विप संरक्षण क्षेत्र अधिसूचना** तयार करण्यात यावी. या अधिसूचनेला तयार करताना बेटांवरील नैसर्गिक परिसंस्था, सामा-आर्थिक परिस्थिती, विशेषतः मच्छिमारांची परिस्थिती, समुद्राच्या पातळीत होणाऱ्या वाढीमुळे वाढती असुरक्षितता आणि २६ डिसेंबर २००४ च्या त्सुनामी लाटांमुळे झालेला आघात यांचा विचार करावा. सदर द्विप संरक्षण क्षेत्र अधिसूचना त्या त्या बेटांवरील प्रशासन आणि जनसमुहांबरोबर चर्चाविमर्ष करुनच मंजूर व्हावी.

**जंबुद्विप : जनविरहीत संवर्धन**

जंबुद्विप हे बंगालच्या उपसागरातील एखाद्या ठिपक्यासारखे बेट आहे. या बेटावरील मासे सुकविणाऱ्या मच्छिमारांना वन्यजीव कार्यकर्त्यांनी सन्माननीय सुप्रिम कोर्टात खेचल्यामुळे हे बेट चर्चेत आले. खारफुटीच्या जंगलाने अर्धे अधिक व्यापलेल्या या बेटावरील अतिक्रमणाविरुद्ध न्यायालयात केस दाखल करण्यात आली. जंगलाशी निगडीत विषयांवर सन्माननीय न्यायालयास सल्ला देण्यासाठी सेंट्रल एम्पॉवर्ड कमिटी स्थापन केलेली असते. या समितीने वरील केसबाबत तयार केलल्या अहवालामध्ये असे मत मांडले की वनसंर्वधन कायदा, १९८० नुसार मासे सुकविणे हे वनाधारीत काम होऊ शकत नाही आणि म्हणून ते करण्यास परवानगी देऊ नये.

मच्छिमारांनी आपले म्हणणे मांडले की त्यांना पुर्ण दिवसभर उघड्या समुद्रावर आपला जीव धोक्यात घालून ते मासे पकडतात. हे मासे सुकविण्यासाटी जंबुद्विप ज्यास नैसर्गिक बंदराची जागा प्राप्त आहे आणि मोकळी जमिन आहे असे एकमेव संक्रमण स्थळ त्यांना उपलब्ध आहे. त्यांच्याकडे शीतगृहाची सोय नसल्यामुळे मासे सुकवून विकणे हा एकमेव पर्याय त्यांच्याकडे

आहे. त्यांची मासेमारीची पद्धत शाश्वत असून त्यांची जाळी हाताने विणलेली व ज्यामध्ये केवळ प्रौढ मासेच सापडतील अशा पद्धतीने विणलेली आहेत. निसर्गाकडून ते केवळ गरज आहे तेवढेच मिळवतात. मच्छिमारांनी त्यांच्या कामामुळे येथिल खारफुटीच्या परिसंस्थेला कोणताही धक्का लागत नाही असे स्पष्ट केले. त्यांना वन विभागाकडून मिळालेला परवाना आणि पावत्या पाहता हे बेट सन १९५० पासून या कामासाठी वापरात असल्याचे दिसते. खारफुटीची तोड नगण्य स्वरुपात आहे. गेल्या अनेक वर्षांत तिथे उपलब्ध २००० हेक्टर खारफुटीपैकी केवळ २०० हेक्टर खारफुटीचे आवरण कमी झालेले उपग्रहाधारीत छायचित्रातून दिसून आले. मच्छिमारांनी ही या बेटावरील व्यवस्थापनाची योजना मांडली ज्यामध्ये ते भरत असलेल्या परवान्याचे पैसे खारफुटीच्या लागवडीसाठी वापरणे, बोटींच्या संख्येवर मर्यादा घालणे व एंकदर शाश्वत पद्धतीचे व्यवस्थापन बेटावर अंमलात आणणे, इ.चा समावेश आहे.

मात्र त्यांचे म्हणणे कोणी ऐकत नाही. मासेमारी, मासे सुकवणे, विकायला नेणे आणि विकणे, इ. कामात जवळजवळ १० हजार लोक समाविष्ट आहेत ज्यांना भविष्यात हे बेट वापारायचे नाही असे सांगण्यात आले आहे. निसर्गाचे संवर्धन या ठिकाणी त्यांना मित्र नव्हे तर शत्रु वाटत आहे.

**७.७ नविन संरक्षण प्रणालीचा स्विकार करणे-उदा. अत्यंत असुरक्षित सागरकिनाऱ्यांचे संरक्षण-संवर्धनाच्या धोरणांचा स्थानिक जनसमुह विशेषतः मच्छिमार कुटुंबांवर होणाऱ्या परिणामांबाबत चर्चाविमर्ष करुन स्विकारणे.**

सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ नुसार राष्ट्रीय उद्यान/सागरी उद्यान, अभयारण्य, राखीव वन, वन्यजीव अधिवास, खारफुटी, प्रवाळ/प्रवाळ द्विप, माशांची प्रजनन क्षेत्र, उल्लेखनीय निसर्गसौंदर्य लाभलेली स्थळे/ऐतिहासिक स्थळे/वारसा स्थळे जनुकीय विविधता क्षेत्र, तापमान वृद्धीमुळे वाढणाऱ्या समुद्राच्या पातळीमुळे बुडणारे किनारे आणि केंद्र सरकार किंवा राज्यस्तरीय अधिकारी यंत्रणा/केंद्रशासित प्रदेशातील यंत्रणेने वेळोवेळी घोषित केलेली क्षेत्र आणि ओहोटी व भरतीच्या मधले क्षेत्र-एक मध्ये मोडणारे किनारे घोषित करता येतात. इतक्या वर्षांमध्ये या क्षेत्रांच्या व्याख्येबद्दल संदिग्ध आणि व्यक्तिनिष्ठ अर्थ लावण्यात येतो.

पर्यावरणीयदृष्ट्या संवदेनशील क्षेत्राची व्याख्या स्पष्ट करण्याचा प्रयत्न सागरकिनारा नियमन क्षेत्र व्यवस्थापन अधिसूचना,२००८ मध्ये करण्यात आला. खारफुटी क्षेत्रापासून ते पक्ष्यांच्या अंडी घालण्याच्या क्षेत्रापर्यंत अशा १२ क्षेत्रांची यादी तयार करण्यात आली जी अधिसूचनेच्या परिशिष्ट दोनमध्ये देण्यात आली आहे.

तसेच, समितीला हेसुद्धा माहित आहे की देशातील समुद्रकिनारी लागूनच बरीच राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य आणि सागरी उद्यान क्षेत्र आहेत-उदा. चिलका, पुलिकत, पिचावरम,मन्नारचे आखात, वेम्बनाड, कोरिंगा, कच्छचे आखात, इत्यादी. याच भागात मच्छिमारसुद्धा राहत आहेत. या जैवसमृद्ध प्रदेशांकडे विशेष लक्ष पुरविण्याची गरज आहे. ही क्षेत्र स्थानिक जनसमुहांच्या उपजीवेकेचा आधार आहेत आणि विकासकामांमुळे प्रभावित ही होत आहेत. समितीसमोर, या क्षेत्रांबाबत असा प्रस्ताव आला की या क्षेत्रांना अधिक संरक्षण देण्यासाठी अत्यंत असुरक्षरित सागरकिनारा क्षेत्र म्हणून घोषित करता येऊ शकेल.

समितीने या गोष्टीची नोंद घेतली आहे की अशा केसेसमध्ये संवर्धनाच्या प्रयत्नात स्थानिक मच्छिमारांचे जीवन उध्वस्त व्हायच्या मार्गावर गेले. ओरिसामध्ये या कारणास्तव सहनशक्ती संपलेल्या काही मच्छिमारांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. भितरकनिका राष्ट्रीय उद्यानाच्या स्थापनेमुळे त्यांना विस्थापित व्हावे लागले आहे. अशाच प्रकारे, बंगालच्या उपसागरांतील जंबुद्विप नावाच्या छोटाशा बेटावरुन मासे सुकवायचे काम करणाऱ्या मच्छिमारांना हाकलून देण्यात आले. पहा : जंबुद्विप :जनविरहीत संवर्धन) अशा काही घटनांची पुररावृत्ती टाळून मच्छिमारांचे हित जपण्याचे प्रयत्न केले जावे.

उपरोक्त गोष्टींचा सारासार विचार करुन अत्यंत असुरक्षित सागरकिनारा क्षेत्र स्थापन करण्याचा मंत्रालयाने विचार करावा अशी शिफारस समिती करीत आहे.

७.८ खारपुटीच्या क्षेत्राचे स्पष्ट व्याख्या करुन संरक्षण करणे. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये खारफुटीचे कोणत्याही परिस्थितीत रक्षण करण्याची तरतूद आहे. मात्र असे लक्षात आले आहे की राज्य सरकार खारफुटीची व्याख्या करताना १ हेक्टर घनता आणि १ मीटर उंच वाढलेल्या खारफुटीच्या जंगलालाच खारफुटी अशी मान्यता देऊन संरक्षण देतात. सन्माननीय मुंबई उच्च न्यायालयाने (याचिका क्र.३२४६/२००४) महाराष्ट्र शासनाला खारफुटी क्षेत्राचे नकाशे तयार करण्याचे आदेश दिले आणि अशा सर्व क्षेत्रांना संरक्षित वन म्हणून घोषित करण्यास सांगितले. असे लक्षात आले आहे की खारफुटीचे नकाशे तयार करुन त्यांना संरक्षित वन म्हणून घोषित करण्याचे काम अजून पूर्ण झालेले नाही. व्याख्येतील अस्पष्टतेमुळे काही विकास प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात खारफुटीचे जंगल ताब्यात घेण्याची शक्यता आहे. समिती अशी शिफारस करते की खारफुटीला संरक्षण देणे अत्यंत महत्वाचे आहे, विशेषतः खारफुटी समुद्रकिनाऱ्यांना जैवकवच पुरवितात, माशांना प्रजननासाठी संरक्षित क्षेत्र पुरवितात, त्सुनामी किंवा चक्रीवादळापासून संरक्षण पुरवितात आणि मच्छिमार समाजाला उपजीविका प्रदान करतात. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खारफुटीची लागवड करणे अत्यंत कठीण आहे, त्यामुळे एकदा का खारफुटीचे क्षेत्र नष्ट झाले तर नविन लागवडीपासून पूर्वीसारखे आवरण निर्माण करणे खूपच कठीण असते.

समिती अशी शिफारस करते की मंत्रालयाने संपूर्ण देशातील अस्तित्वात असलेल्या खारफुटीच्या जंगलांचे आणि संभाव्य खारफुटी क्षेत्रांचे नकाशे तयार करावे खारफुटी क्षेत्राची नीट व्याख्या करुन अशा सर्व क्षेत्रांना वनीकरण प्रकल्पांमार्फत समाविष्ट करुन घ्यावे.

हरित भारत प्रकल्पांप्रमाणेच खारफुटीचे पुर्नःरोपण, सागरकिनारे, वाळूच्या चौपाट्यांचे संवर्धन करणारे प्रकल्प तयार करावेत. सर्व खारफुटीची क्षेत्रे जैवकवच म्हणून व सागरी उत्पादनक्षम क्षेत्र म्हणून संरक्षित केली जावीत.

७.९ सध्याचे आणि भविष्यातील धोके लक्षात घेऊन समुद्राच्या दिशेचे संरक्षित करणे, मात्र हे करताना मच्छिमारांच्या उपजीविकेवर बंधन येणार नाही याची काळजी घेणे.

सागर किनाऱ्यावरील पर्यावरण हे समुद्रातील पाण्याच्या अभिसरणावर अवलंबून असते. आपण समुद्राच्या पाण्याने व्यापलेला क्षेत्रास वगळून सागरकिनाऱ्यांचे व्यवस्थापन करु शकत

नाही. तसेच किनाऱ्यावर घडलेल्या गोष्टिचा परिणाम समुद्राच्या पाण्याने व्यापलेल्या क्षेत्रावरही होतोच - मग ते प्रदुषण असो बांधकाम असो. समितीला अशी माहिती पुरवण्यात आली की कशा पद्धतीने बंदर आणि जेट्टी बांधण्याच्या प्रक्लपांनी समुद्रात भराव टाकून सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेचे उल्लंघन केले आहे. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये समुद्राकडील पाण्याचे क्षेत्र समाविष्ट नसल्याने नियमन करणे मुश्किल होते. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये समुद्राचे १२ नॉटीकल मैल क्षेत्र ही पाण्याकडील मयादारेषा मानण्यात आली आहे.

सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २००८ मधील उपरोक्त तरतूदीला मच्छिमार समाजाने विरोध दर्शवला आहे. त्यांच्यामते या तरतुदीचा त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होऊ शकतो. समुद्रावरील त्यांचा वापर संपुष्टात येऊन उद्योगांना समुद्रावर विकास करण्यास मोकळीक मिळेल. या तरतूदीने असे काही निश्चितच घडू नये.

समिती अशी शिफारस करीत आहे कि समुद्राकडील क्षेत्राचा सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये समावेश करण्यात यावा. परंतु, मच्छिमार समाजाचे हित धोक्यात घालून अशी दुरुस्ती न करता कठोर व परिणामकारक तरतूद निर्माण करावी.

### ७.१० सागरकिनाऱ्यांच्या संरक्षणासाठी सर्व स्तरावरील नियमन क्षमतांना बळकट करणे.

हे स्पष्ट आहे की सागरकिनाऱ्यांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. जर त्यांचा व्यवस्थित सामना करायचा असेल तर सागकिनाऱ्यांवरील संशोधन करणारी संस्था आवश्यक आहे. सध्या धोरण आणि व्यवहारातील बदल आणण्यासाठी वापरण्यात येणारे ज्ञान आणि त्यासंदर्भातील माहिती संकलन यामध्ये खूप मोठी तफावत आहे. उत्तम निर्णय प्रक्रिया राबविण्यासाठी केंद्र आणि राज्य स्तरावर अस्तित्वात असलेल्या नियमन संस्थांना अधिक बळकटी आणण्याची गरज आहे. यामध्ये नव्याने सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन संस्था उभारण्याचाही समावेश असावा. सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या क्षमता वाढविणे आणि सागरविषयक संशोधनातील नव्या संस्थांची निर्मिती आवश्यक आहे. तसेच यामध्ये लोकसहभाग-विशेषतः मच्छिमार आणि पर्यावरणवादी संस्थांकडील ज्ञानाचा उपयोग करुन घेणे. तसेच मंत्रालयास मदत करण्यासाठी राष्ट्रीय शाश्वत सागरकिनारा व्यवस्थापन मंडळ स्थापन करता येईल जे केंद्राबरोबरच राज्य सरकारांनाही धोरण व कायद्यांच्या संदर्भात आणि अंर्तविरोधातून मार्ग काढण्यास मदत करील.

समिती अशी शिफारस करीत आहे, की सागरकिनाऱ्यांचचे संरक्षण करण्यासाठी संस्थात्मक क्षमतांचा विकास करणे अत्यंत आवश्यक गोष्ट आहे.

### ७.११ भविष्यातील समुद्राच्या पातळीत होणारी वाढ आणि सागरकिनाऱ्यांची असुरक्षितता याविषयी धोरण आखणे.

समितीचे असे मत आहे की देशातील सागरकिनारे भविष्यात उद्भवणाऱ्या समुद्राच्या पाण्याच्या पातळीत होणाऱ्या वाढीमुळे धोक्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, समुद्राकडून येणारी वादळे आणि राक्षसी लाटांचाही धोका सातत्याने आहे. यामुळे केवळ सागरकिनाऱ्यांवर राहणाऱ्या

लोकांनाच धोका आहे असे नाही तर पूर्ण सागरकिनाऱ्यावरील जैविक परिसंस्थाही धोक्यात आली आहे जी लाखो लोकांच्या उपजीविकेचा आधार आहे. मंत्रालयाने यासाठी पूर्ण सागरकिनाऱ्यावर असुरक्षित क्षेत्र आणि धोका रेषा आखून घेणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या अंदाज केलेली समुद्रपातळीतील वाढ आणि अन्य धोक्यांचा विचार करण्यात आल्यामुळे सध्याचा आणि भविष्यातील धोक्याचे आकलन करणे शक्य होईल. एकदा का अशी असुरक्षित क्षेत्र आणि धोक्याची रेषा आखली की त्या क्षेत्राचा सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये समावेश करणे. असे केल्यामुळे अतिमहत्त्वाची स्थळे आणि जास्त लोकसंख्येची क्षेत्र यांना व्यवस्थित संरक्षण देता येईल. याबाबत होणाऱ्या अभ्यासातून सागरकिनाऱ्यांच्या संरक्षणाबाबतची धोरणे निश्चित करण्यास मदत होईल. हे स्पष्ट आहे की येत्या काही विध्वंसापासून बचाव करण्यासाठी अनुकूल संरक्षण यंत्रणा उभारण्यावर आणि गुंतवणूकीवर भर देण्याची नितांत गरज आहे.

# परिशिष्ट १ :

**क्रमांक ११-८३/२००५-आय. ए. - तीन (पी.टी.)**
भारत सरकार
पर्यावरण आणि वन मंत्रालय
(आय. ए.-तीन विभाग)

पर्यावरण भवन,
सी.जी.ओ. कॉम्प्लेक्स, लोधी रोड,
नवी दिल्ली - ११०००३.
दिनांक १५ जून २००९

**आदेश**

**विषयः सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेस अंतिम रुप देण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना.**

१. पर्यावरण आणि वन विभागाने एस. ओ. क्र. १०७०(इ) दिनांक १.५.२००८ रोजी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेचा मसुदा जारी केला, आणि या अधिसूचनेमध्ये क्र. एस.ओ.क्र. ११२० (इ), दिनांक ९.५.२००८ रोजी करुन पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ नुसार लोकांनी ६० दिवसांच्या आत त्यावर सूचना व हरकती दाखल करण्याबाबत दुरुस्ती केली. तसेच, राज्य सरकाराच्या विनंतिनुसार ही अधिसूचना दिनांक २२ जुलै २००८ रोजी पुन्हा जारी करण्यात आली.

२. मंत्रालयास सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेवर मोठ्या प्रमानात प्रतिक्रिया मिळाल्या. या प्रतिक्रियांचे मुल्यमापन करण्यासाठी मंत्रालयाने प्राध्यापक एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती स्थापन केली. या समितीवरील सदस्याची नावे पुढीलप्रमाणे-

   १. प्राध्यापक एम. एस. स्वामिनाथन, अध्यक्ष, एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन, ३ री क्रॉस गल्ली, इन्स्टीट्युशनल एरिया, तरामणी, चेन्नई - अध्यक्ष

   २) डॉ. शैलेश नायक, सेक्रेटरी, सागर विकास विभाग, नवी दिल्ली.

   ३) श्रीम.सुनिता नारायण : सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट ४१, तुघलकाबाद इन्स्टीट्युशनल एरिया, नवी दिल्ली-११००६२.

   ४) श्री. जे एम माऊस्कर, ॲडिशनल सेक्रेटरी, पर्यावरण आणि वन मंत्रालय.

३. सदर समिती -

   १. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ बाबत मंत्रालयाकडे आलेल्या प्रतिक्रियांचे मुल्यमापन करणे.

   २. एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन साध्य करण्यासाठी धोरण आणि कायदेशीर चौकटीबाबत सल्ला देणे.

   ३. समिती आवश्यकता वाटल्यास जादा सदस्यांना स्विकृत करील आणि तिचा अहवाल दि. १५ जुलै २००९ रोजी सादर करील.

४. समिती तिच्या सभा देशात कुठेही भरवू शकेल. बिगर सरकारी सदस्यांना टि.ए/डी.ए आणि सिटिंग फी नियमानुसार देण्यात येईल.

५. आय. एफ.डी डेप्युटी क्रमांक ४१८/डि.एस/आयएफडी दिनांक ११ जुन २००९ प्रमाणे जारी.

**(डॉ. ए. सेंथिल वेल)**
ॲडिशनल डायरेक्टर
टेलिफॅक्स : २४३६०६९४.
इमेल : senthil.vel@nic.in

# परिशिष्ट २ :

| अनु.क्र. | कामांची यादी | क्षेत्र-एक १ (१) | क्षेत्र-दोन १ (२) | क्षेत्र-२ | क्षेत्र-तीन (भरतीरेषा ते २०० मीटर) | क्षेत्र-तीन (२००-५०० मीटर) | क्षेत्र-चार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नविन उद्योगधंदे | X | X | X | X | X | X |
| २. | उद्योगधंद्यांचा विस्तार | X | X | X | X | X | X |
| ३. | अणुऊर्जा प्रकल्प | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ४. | माहिती आणि तंत्रज्ञान | X | X | X | ✓(सेझ) | ✓(सेझ) | X |
| ५. | विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ)प्रकल्प | X | X | ✓(सेझ) | ✓(सेझ) | ✓(सेझ) | X |
| ६. | अपारंपारिक ऊर्जा | X | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ७. | डिसॅलिनेशन | X | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ८. | हवाई पट्टी | X | X | ✓(लक्षद्विप) | ✓(लक्षद्विप) | X | ✓ |
| ९. | पी.ओ.एल.उत्पादन | X | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १०. | एल.ॲड.जी | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | X |
| ११. | मत्स्य प्रक्रिया | X | X | X | X | X | X |
| १२. | मत्स्यबीज नर्सरी | X | X | X | X | X | X |
| १३. | मासे सुकवणे | X | X | X | ✓ | ✓ | ✓ |
| १४. | प्रक्रिया केलेले सांडपाणी | X | X | ✓ | ✓ | ✓ | X |
| १५. | पर्जन्य जलवाहिनी | X | X | ✓ | ✓ | ✓ | X |
| १६. | शहरातील कचरा | X | X | X | X | X | X |
| १७. | भराव | X | X | X | X | X | X |
| १८. | टी.पी.एस.ची राख | X | X | X | X | X | X |
| १९. | भरावातून जमीन तयार करणे | X | ✓(P&H) | ✓(P&H) | ✓(P&H) | ✓(P&H) | ✓ (P&H) |
| २०. | बंदर विस्तार | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २१. | जेट्टी | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २२. | धक्का | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २३. | कवे धक्का | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २४. | गोदीतील उतार | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २५. | ब्रिज | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २६. | सी-लिंक | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २७. | धूप रोधक | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २८. | लाटांचे नियामक | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २९. | क्षारांचा शिरकाव रोखणे | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ३०. | व्यापारी संकुल | X | X | | X | X | X |
| ३१. | वाळू/दगडाचे खाणकाम | X | X | X | X | X | X |
| ३२. | दुर्मिळ खनिज | X | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ३३. | तेल आणि वायू | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ३४. | भूजल काढणे. | X | X | ✓ | X | ✓ | ✓ |
| ३५. | फळबाग | X | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ३६. | शेती | X | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ |

पुढे चालू...

| अनु.क्र. | कामांची यादी | क्षेत्र-एक १ (१) | क्षेत्र-दोन १ (२) | क्षेत्र-२ | क्षेत्र-तीन (भरतीरेषा ते २०० मीटर) | क्षेत्र-तीन (२००-५०० मीटर) | क्षेत्र-चार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३७. | मत्स्यशेती | x | x | x | x | ✓ | ✓ |
| ३८. | पाईपलाईन | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ३९. | वाळूच्या चौपाट्यांमध्ये हस्तक्षेप | x | x | x | x | x | x |
| ४०. | संरक्षण प्रकल्प | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ४१. | वाहन व्यवस्था | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ४२. | ट्रांसमिशन लाईन्स | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ४३. | जहाजात चढायची जागा | ✓(लक्षद्विप) | x | x | x | x | |
| ४४. | औष्णिक उर्जा प्रकल्प | x | x | x | x | x | x |
| ४५. | गृहबांधणी प्रकल्प | x | x | ✓ | x | x | x |
| ४६. | हवामान मापक रडार | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ४७. | पुरातत्व किंवा वारसा स्थळ पाडणे किंवा पुन्हा बांधणे | x | x | | x | x | x |
| ४८. | दवाखाना | ✓(सुंदरबन) | x | ✓ | ✓ | ✓ | x |
| ४९. | शाळा | ✓(सुंदरबन) | x | ✓ | ✓ | ✓ | x |
| ५०. | पावसापासून संरक्षण छप्पर | ✓(सुंदरबन) | x | ✓ | ✓ | ✓ | x |
| ५१. | सार्वजनिक शौचालय | ✓(सुंदरबन) | x | ✓ | ✓ | ✓ | x |
| ५२. | रस्ता | x | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ५३. | पाणी पुरवठा | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ५४. | सांडपाणी | x | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ५५. | गटार | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ५६. | मिठागर | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ५७. | धान्याचे कोठार | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ५८. | खताचे कोठार | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ५९. | खाद्यतेलाचे कोठार | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ६०. | उद्यान | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ६१. | क्रिडांगण | x | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ६२. | जंगल | x | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ६३. | चौपाटीवरील रिसॉर्ट | x | x | ✓ | x | ✓ | ✓ |
| ६४. | प्रवाळांतील खाणकाम | x | x | x | x | x | x |
| ६५. | पाण्याखालील सुरुंगस्फोट | x | x | x | x | x | x |
| ६६. | निवासस्थाने | x | x | ✓ | x | ✓ | ✓ |
| ६७. | इमारतींची पुर्नबांधणी | x | x | ✓ | ✓ | ✓ | ✓ |

नोंद. उपरोक्त कामांचा तपशिल हा प्रत्येक राज्य सरकार/केंद्रशासित प्रदेशाची सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना, न्यायालयाचे आदेश,स्थानिक नियामक यंत्रणेने काढलेला अर्थ आणि सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मधील विशिष्ट परिच्छेदातील तरतूदीनुसार ठरविला जातो. एखादे काम ५ कोटी रुपयांपेक्षा कमी अंदाजपत्रकाचे असेल तर त्याला राज्य सरकारची मंजुरी मिळू शकते आणि ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त अंदाजपत्रकाच्या कामाला केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाची मंजुरी घ्यावी लागते.

# परिशिष्ट ३ : सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ बाबत सागरकिनारा लाभलेल्या राज्यांच्या प्रतिक्रिया/शिफारसी

| क्र. | राज्य | समाविष्ट करण्यायोग्य सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिसूचनेतबाबतचे प्रश्न | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र | शिफारस |
| १. | गुजरात | सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना,१९९१ ची अंमलबजावणी करावी<br>सागरकिनाराविषयक धोरण आणि कायद्यात प्रत्येक राज्य आणि त्यामधील प्रत्येक सागरकिनाऱ्यास वेगवेगळ्या पद्धतीने हाताळता येण्याची लवचिकता हवी.<br>सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या अंमलबजावणीत सरकारच्या विविध विभागांमध्ये कामे हाताळतांना सुसुत्रता कशी असेल यावर स्पष्टता येत नाही. | क्षेत्रांची विभागणी स्पष्टपणे झालेली नाही.<br>मच्छिमारांचे उपजीविकेचे हक्क दुर्लक्षित केले आहेत.<br>एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेत स्थानिक जनसमूहांची भूमिका नमूद केलेली नाही. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द करण्यात यावी. |
| २. | महाराष्ट्र | सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना १९९१ गेली १७ वर्षे अस्तित्वात असताना अजूनही भरती आणि आहोटी रेषा स्पष्ट करण्यात आलेली नाही.<br>सागरकिनारा व्यवस्थापना क्षेत्र अधिसूचना अंमलबजावणीत ग्रामपंचायत आणि इतर सरकारी यंत्रणेची भूमिका स्पष्ट होत नाही. | स्थानिक आणि मच्छिमार जनसमूहांचे हक्क आणि उपजीविका तसेच सागरकिनारा परिसंस्थांना संरक्षण नाही.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमुळे समुद्रकिनाऱ्यांवर व्यापारी हेतूने प्रेरीत गोष्टींना मोकळे रान मिळेल.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये व्यवस्थापनाची कामे संदिग्ध आहेत. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेला पाठिंबा नाही.<br>सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ अधिक बळकट करुन त्याच्या नियमनात स्थानिक लोकांचा सक्रीय सहभाग घ्यावा. |
| ३. | गोवा | सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या काही चांगल्या तरतूदी समाविष्ट करुन बळकटी आणावी, उदा. सेटबॅक लाईन. प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना कार्यक्षम आणि परिणामक्षम बनविणे. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना २००८ चा मसुदा प्रक्रिया वादग्रस्त आहे.<br>जर सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना २००८ लागू झाली तर सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ च्या तरतुदींचे उल्लंघन नियमित करुन घेतले जाण्याची भीती आहे. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द केली जावी. |
| ४. | कर्नाटक | आपल्या उपजिविकेसाठी सागरकिनाऱ्यांजवळ राहणाऱ्या मच्छिमार जनसमूहांचे हक्क सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये नाकारण्यात आले आहेत.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंतर्गत सागरकिनारा परिसंस्थेचे संरक्षण झालेच पाहिजे. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-दोन मध्ये सर्व मच्छिमार गावांचा समावेश होईल आणि पूर्ण किनारा सर्वांसाठी खुला होईल कारण एरिया ऑफ पर्टिक्युलर कर्न्सन या वर्गवारीत एका चौ. कि.मी मध्ये ४०० व्यक्तींची घनता येथ गृहीत धरली आहे. | लोकांची घरे बांधणे व तत्सम कामांच्या दृष्टीने सेटबॅक लाईन म्हणजे लक्ष्मणरेषाच झाली.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेत मार्फत पुरस्कृत शहरीकरण सागरकिनारा परिसंस्था व पर्यावरणाचा विध्वंस करील.<br>सागरकिनारा नियमनक्षेत्र अधिसूचना १९९१ लागू झाल्यानंतरची उल्लंघने सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये नियमित करुन घेतली जातील | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द केली जावी<br>सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी.<br>उल्लंघन करणाऱ्यांवर कडक करावाई व्हावी. |

| क्र. | राज्य | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | **अधिसूचनेतबाबतचे प्रश्न** | **सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र** | **शिफारस** |
| ५. | केरळ | समुद्रकिनारा लाभलेल्या प्रत्येक राज्याची विकास व संरक्षणाची स्वतंत्र योजना हवी.<br>केरळमध्ये बॅक वॉटर आणि ४० नद्या आहेत ज्या भरतीमुळे प्रभावित होत असतात, त्यांचा सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या, २००८ च्या क्षेत्र-तीन मध्ये समावेश होईल. त्यामुळे, सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये केवळ सागरकिनारा गृहीत धरला जातो तर सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये आतमधील नदीक्षेत्रही गृहीत धरले जाईल.<br>सेटबॅक लाईन स्पष्ट नाही. | सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ लागू झाल्यानंतरची उल्लंघने सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना,२००८ मध्ये नियमित करुन घेतली जाण्याची भीती आहे.<br>सदर अधिसूचना ही उद्योगधंदे, पर्यटन, खाणी व बांधकाम व्यावसायिकांच्या सोयीसाठी केलेली वाटते.<br>सागरकिनारा मच्छिमारांकडे परंपरेने चालत आलेला आहे. त्यांना त्यांच्या या घरातून बाहेर काढू नका. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द करण्यात यावी.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेला पाठिंबा नाही. |
| ६. | आंध्र प्रदेश | १२ नॉटिकल माईल्स समुद्रक्षेत्रात कोणकोणत्या कामास परवानगी असेल त्याची यादी हवी आणि मच्छिमारांच्या उपजीविकेवर गदा आणणाऱ्या कामांना परवानगी देऊ नये.<br>सागर संसाधन, मच्छिमारांचे हक्क आणि सागरी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सर्वसमावेशक अशा कायद्याची निंतात गरज आहे. मच्छिमारांचे पारंपरिक हक्क यामध्ये स्पष्ट व्हावेत.<br>जन-परिसंवादामध्ये मच्छिमार जनसमुहांचे आणि पंचायत यंत्रणेचे पुरेसे प्रतिनिधीत्व घेऊन त्यांच्या मते जाणून घेतल्यावरच अंतिम निर्णय घेणे.<br>सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये मच्छिमारांचे पारंपारिक हक्क, उपजीविकेच्या गरजा आणि सागरकिनारा परिसंस्थेचे संरक्षण होत आहे. | सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना १९९१ मध्ये सागरकिनाऱ्यांच्या संरक्षणाचा हेतू आहे तर सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ सागरकिनाऱ्यांचा विकासाचा किंवा उद्योगधंद्यांचा हेतू लक्षात येतो.<br>सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मीटरची तरदूत तशीच ठेवून सागरकिनारा व्ययस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मधील सेटबॅक लाईनची संकल्पना सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये समाविष्ट करावी. | सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ अधिक बळकट करुन त्याच्या नियमनात स्थानिक लोकांचा सक्रीय सहभाग घ्यावा.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ रद्द केली जावी. |
| ७. | ओरिसा | सागरकिनाऱ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्वसमावेशक कायद्याची गरज आहे.<br>परदेशी मच्छिमार बोटींना देशाच्या सागरी हद्दीत प्रवेश देऊ नये.<br>सागरकिनाऱ्यावर येणारे औद्योगिक प्रकल्प पहाता, आपल्या क्षेत्रात काय येऊ द्यायचे याचा निर्णय घेण्यासाटी स्थानिक जनसमूहांना नियोजन करण्याचे अधिकार हवे. | सागरकिनारा व्यस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या नावाने सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमधील तरतूंदीचा भंग केलेली कामे नियमित करुन घेतली जातील.<br>ज्याचा समुद्राशी पहिला संबंध आहे त्या स्थानिक जनसमूहांना विश्वासात घेतले जात नाही.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने अंतर्गत अनेक गोष्टींना संवदेनशील परिसंस्थेत होऊ देण्यास मुभा दिली आहे.<br>जे परंपरागत समुद्राशी जोडले गेले आहेत त्या मच्छिमारांना बाजूला करुन नविनच लोकांना समुद्र किनाऱ्यांचे निर्णय घेण्यासाठी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेत समाविष्ट केले आहे. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८रद्द केली जावी<br>सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी.<br>उल्लंघन करणाऱ्यांवर कडक करावाई व्हावी. |

| क्र. | राज्य | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | **अधिसूचनेतबाबतचे प्रश्न** | **सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र** | **शिफारस** |
| ८. | पश्चिम बंगाल | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना मधील सागरकिनाऱ्यांची वर्गवारी आणि व्यवस्थापनाची पद्धत नीट स्पष्ट करण्यात यावी.<br>मसूद्यातील शाश्वत विकास, शाश्वत सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन पद्धती, उत्तम शास्त्रीय तत्वप्रणाली अशा संकल्पना स्पष्ट केलेल्या नाही. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने अगोदरच्या सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेतील तरतूदींचा ताकद ओळखलेली नाही याउलट उल्लंघनांना नियमित करुन घेतले जाण्याची जास्त भीती आहे.<br>ग्रीनफिल्ड एअरपोर्टचा उल्लेख दुरुस्तीमध्ये असला तरी अधिसूचनेत नाही. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना २००८ ही स्थानिक जनसमूहांना उपयुक्त नाही. |

## मच्छिमार मंचाच्या प्रतिक्रिया

| राज्य | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|
| | **अधिसूचनेतबाबतचे प्रश्न** | **सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र** | **शिफारस** |
| राष्ट्रिय मच्छिमार मंच, कोलकाता | सागरकिनारा परिसंस्थेचे संरक्षण आणि स्थानिक जनसमूहांच्या मुलभूत हक्कांचे व उपजीविकेचे रक्षण झाले पाहिजे. सागरकिनारा क्षेत्र नियोजनात समुद्राला केंद्रस्थानी मानावे.<br>मच्छिमार व स्थानिक जनसमूहांना विश्वासात घेऊन सागरकिनारा व्यवस्थापन योजना बनविणे.<br>लोककेंद्री निर्णय प्रक्रिया राबवावी, सरकारी आदेश राबविणारी निर्णय पद्धती असू नये. कोणत्याही कायद्याच्या मसुद्याला अंतिम रुप देण्यापूर्वी संसदीय समितीने सूचविलेल्या प्रकारे चर्चा व्हावी.<br>कोणत्याही कायद्याच्या मसूद्याला अंतिम रुप देण्यापूर्वी संसदीय समितीने सूचविलेल्या प्रकारे चर्चा व्हावी. | सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना मधील उल्लंघन ठरविण्यात आलेल्या गोष्टींना सागरकिनार व्यवस्थापन क्षेत्रामध्ये नियमित करुन घेण्याचा प्रयत्न दिसतो.<br>स्थानिक जनसमूहांचा समुद्रकिनारा आणि सागरी संपत्तीवरचा हक्क हिरावून घेत व्यापारी/ उद्योगधंदे, पर्यटन, तेलशुद्धीकरण व खाणकामांसाटी मोकळे रान ठेवण्याची तरतूद केली आहे.<br>राष्ट्रीय मच्छिमार मंच पुन्हा एकदा एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या दुसऱ्या समितीने सूचविलेल्या शिफारशी मानत नाही.<br>३० जुन २००९ रोजी राज्यस्तरीय धरणे आंदोलन जाहीर करीत राष्ट्रीय मच्छिमार मंच पर्यावरण मंत्री व अन्य मंत्र्यांना जुलै २००९ मध्ये भेटणार आहे. केंद्रिय पर्यावरण आणि वनमंत्र्यांनी त्यांना कालावधी दिला आहे. | |

## केंद्र सरकार

| अनु क्र. | मंत्रालय/ विभाग | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिसूचनेतबाबतचे प्रश्न | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र | शिफारस |
| १ | कृषी मंत्रालय | पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रामधून वाळूच्या चौपाट्या, पूळण, दलदलीची मैदाने, समुद्रकिनाऱ्यावरील गोड्या पाण्याचे साठे यांना वगळण्यात यावे.<br>सेटबॅक लाईनची व्याख्या अतिशय संदिग्ध असून तिचा चुकीचा अर्थ काढला जाऊ शकतो.<br>सेटबॅक लाईन सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना मंजूर झाल्यांनतर २ वर्षात आखायची आहे. त्याऐवजी ती मंजूर होण्याच्या पूर्वीच आखून घेणे.<br>अधिसूचना स्थानिक भाषेत पुरविण्यात यावी. | परिशिष्ट सहा(१) (क) मधील मत्स्यबीज नर्सरी आणि सागरकिनाऱ्यावरील कृत्रिम मत्स्योत्पादन ज्यांचे नियमन कोस्टल ॲक्वाकल्चर ऑर्थॅरिटी ॲक्ट, २००५ नुसार करण्यात येते, त्याचा उल्लेख मारी कल्चर असा करणे. हा उल्लेख आवश्यक आहे कारण कोस्टल ॲक्वाकल्चर ही एकमेव पद्धत आहे असे मानत नाही. कोस्टल ॲक्वाकल्चर ऑर्थॅरिटी ॲक्ट, २००५ नुसार सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना मध्ये ॲक्वाकल्चरला मान्यता आहे. | |
| २. | नगरविकास मंत्रालय | हवामानातील बदल, भूकंपप्रवण क्षेत्र आणि नैसर्गिक धोके यांना लक्षात ठेवून सेटबॅक लाईनचे मुल्यमापन करावे.<br>नकाशा बनविण्याची प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक यंत्रणा काय असेल याविषयी स्पष्टीकरण हवे. | पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र ठरविताना स्थानिक गरजा आणि सध्याच्या तरतूदींचा विचार करावा.<br>राष्ट्रीय मंडळात अंदमान व निकोबार बेटावरील आदिवासींच्या प्रतिनिधींचा समावेश करावा. | |
| ३. | नगरविकास मंत्रालय | समुद्राचे चैतन्य व गतिशीलता लक्षात घेऊन सेटबॅक लाईनचे निकष विचारात घ्यावे.<br>पर्यावरणीदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र ठरवून घ्यावे.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना व्यापार नियम, १९६१ च्या समरुप असावी. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने मधील तरतूदी नगर रचना, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार, नागरी सुविधा उदा.पाणीपुरवठा, गटारे, सांडपाणी, आरोग्य, इ. च्या विरोधात जाणाऱ्या असू नयेत. | | |
| ४. | नागरी उड्डाण मंत्रालय | परिशिष्ट सहामधील सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-तीन मध्ये परवानगी असलेल्या गोष्टी ज्यांचे पर्यावरणीय आघात मुल्यमापन झाले आहे आणि पर्यावरण व्यवस्थापन योजना पर्यावरण मंत्रालयातून संमत झाली आहे. त्याचा विस्तार आणि त्यामध्ये सुधारणा आणणे ज्यामध्ये सध्याचे विमानतळ, हेलिपोर्ट आणि ग्रीनफिल्ड एअरपोर्ट यांचा समावेश आहे आणि जे सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र - एकमध्ये मोडतात. आर्थिकदृष्ट्या व दळणवळणाच्या माध्यमातून संपर्कात असणे आवश्यक असणारी प्रवाळ बेटे, उदा. अंदमान व निकोबार आणि लक्षद्विप बेटे. | | |

## केंद्र सरकार

| अनु क्र. | मंत्रालय/ विभाग | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | **अधिसूचनेतबाबतचे प्रश्न** | **सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र** | **शिफारस** |
| | सिडको | एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी स्थानिक सरकारला आणि मंजुरी देण्यासाठी पर्यावरण मंत्रालयास ठराविक कालमर्यादा नेमून देण्यात यावी. राष्ट्रीय सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांची भूमिका स्पष्ट करण्याची गरज आहे.<br>मानवनिर्मित जलसाठ्यांमध्ये उदा. होल्डिंग पॉन्ड्स फ्लड कंट्रोल चॅनल इ. वाढणाऱ्या खारफुटीच्या क्षेत्राचा समावेश सागारकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-एक मध्ये करण्यात येऊ नये. बंदर, सागरी वाहतुकीचे धक्के, जलकिडा केंद्र यांना सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-तीनमध्ये समाविष्ट करण्यात यावे. | एकदा का सेटबॅक लाईन आखण्यात आली की स्थानिक यंत्रणेमार्फत मंजूर झालेल्या विकासाची कामे करण्यास परवानगी मिळाली पाहिजे. एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेतील अटी रद्द करण्यात याव्या. | |
| ५. | व्यापार आणि उद्योग मंत्रालय | | | प्रतिक्रिया नाही. |
| ६. | पेट्रोलिअम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय | सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ अनुसार क्रुड ऑईल पाईपलाईन आणि प्रॉडक्ट पाईपलाईन कॉरिडॉर अशा पॅराडीप रिफायनरी प्रोजेक्टसाठी आवश्यक जेट्टी आणि सोयीसुविधा रिफायनरीच्या हद्दीत उभारल्या जातात अशा उच्च गुंतवणूकीच्या प्रकल्पांना नवीन अधिसूचनेमध्ये योग्य त्याप्रकारे समाविष्ट करण्यात यावे. | नदी आणि समुद्राच्या एकत्र येण्याच्या खाडी क्षेत्राला १०० मीटरची सेटबॅक लाईन आखून सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-तीनमध्ये ठेवण्यात यावे. असे खाडी क्षेत्र आय. ओ.सी. एलच्या पॅराडीप रिफायनरी प्रोजेक्टमध्ये संत्रा-खाडी (चाळीस चौरस किलोमीटर नाला) म्हणून ज्ञात आहे.ओरिसा सरकारच्या जलसंसाधन विभागाच्या ऑक्टोबर ९८ च्या रिपोर्टमधील कॅचमेंट एरिया आणि ओरिसा सरकारच्या वन आणि पर्यावरण विभागाच्या १०० मीटर सेटबॅक लाईन रिफायनरीचा आराखडा सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९० प्रमाणे तयार करण्यात आला असून १०० मीटरची सेटबॅक लाईन गृहीत धरली आहे. | |
| ७. | अणू ऊर्जा विभाग | अणू ऊर्जा विभागाचे प्रकल्प सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मधील तरतूदीनुसारच केलेले असतात. त्याचप्रमाणे मोनाझाईट सारख्या दुर्मिळ खनिजाचे उत्खनन केवळ सागारकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या भागातच परवानगीनुसार करण्यात येते. म्हणून सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ प्रमाणेच सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना,२००८ | | |

## केंद्र सरकार

| अनु क्र. | मंत्रालय/ विभाग | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिसूचनेतबाबतचे प्रश्न | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र | शिफारस |
| | | मध्ये अणू उर्जा विभागाच्या पुढील प्रकल्पांना समाविष्ट करुन देण्यात यावे.<br>अणूऊर्जा विभागाच्या सध्याच्या प्रकल्पांचा विस्तार आणि आधुनिकिकरण आणि सागरकिनारा क्षेत्रात मोनाझाईट खनिजाचे उत्खनन क्षेत्र. | | |
| ८. | (अ) स्पेस नॅशनल रिमोट सेन्सिंग एजन्सी, हैद्राबाद | सागारकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने मध्ये १२ नॉटीकल माइल्स ही समुद्राकडील पाण्याची हद्द ठरविण्यात आली आहे जी सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमधील समुद्र किनाऱ्यांच्या हद्दीपेक्षा वेगळी आहे. सागरकिनाऱ्यांचे शाश्वत संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ही शास्त्रीय दिशा आहे.<br>एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना ही जमिनीचा वापर आणि विकासाच्या अंमलबजावणीची संकल्पना आहे. यामुळे सागरकिनाऱ्यांच्या भविष्यातील दिर्घकालीन संरक्षणास मदतच होईल. सेटबॅक लाईन हा सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र आणि एकात्मिक सागरकिनारा व्यवस्थापन योजनेचा पाया असून यापूर्वीच्या ५०० मीटरच्या हद्दीच्या ऐवजी घेण्यात आलेला आहे. सेटबॅक लाईन आखण्यासाठी कालमर्यादा स्पष्ट केलेले नाही. | सेटबॅकलाइन ही समुद्र किनाऱ्यावरील भौगोलिक स्थान असुरक्षितता, भरती-ओहोटीमुळे प्रभावित झालेले क्षेत्र या अनुसार आखण्यात येईल. अशी रेषा आखण्यासाठी त्या भागाचा भौगोलोक इतिहास आणि रिमोट सेसिंग व जि.आय.एस.सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आखली जावी.<br>एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनामध्ये सागरकिनाऱ्यावर राबणाऱ्या लोकांच्या आणि मालमत्तेच्या संरक्षणासाठी निर्णय प्रक्रियेचा वाव ठेवण्यास आला आहे. यामध्ये सागरकिनाऱ्यावरील संसाधनांचे संवर्धन आणि शाश्वत विकास करण्यास वाव आहे. | |
| ८. | (ब) स्पेस ॲप्लिकेशन सेंटर, अहमदाबाद | क्रमांक-६ : खाडी; सरोवर इत्यादी सागरकिनाऱ्यावरील गोड्या पाण्याचे साठे. खाडी हे सागरकिनाऱ्यावरील गोड्या पाण्याचे साठे असू शकत नाहीत. त्याऐवजी अशा साठ्यांना भरती-ओहोटी दरम्यानचे क्षेत्र किंवा नदीमूख क्षेत्र म्हणावे खाडी आणि खाऱ्या पाण्याचे सरोवरे ही भारतीय सागरकिनाऱ्यावरील अनेक ठिकाणी भरती-ओहोटीच्या प्रक्रियेवरच अंवलंबून असतात. सर्व प्रवाळ द्विप सरोवरे ही भरती-ओहोटी प्रक्रियेवरच अवलंबून आहेत. गुजरातमधील खारफुटीच्या क्षेत्रातील खाड्या यासुद्धा पूर्णपणे भरती-ओहोटीच्याच प्रक्रियेवर अवलंबून आहेत. | | |
| ९. | अर्थ सायन्सेस मंत्रालय (आय.एन.सी. ओ.आय.एस.) | एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनेच्या व्याख्येमध्ये सागरकिनारा आणि सागरी परिसंस्था व संसाधन यांचे संरक्षण व संवर्धन समाविष्ट करण्यात यावे.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या | सेटबॅक लाईन आखणे आवश्यक असले तरी केंद्र सरकारसाठी ही एक खूप मोठी जबाबदारी आहे. त्यासाठी लहान प्रमाणातील नकाशे उदा. १.२५०००.<br>कॅडेस्ट्रल स्केलवर असे नकाशे तयार करण्याचे | |

## केंद्र सरकार

| अनु क्र. | मंत्रालय/ विभाग | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिसूचनेतबाबतचे प्रश्न | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र | शिफारस |
| | | क्षेत्र-चार (ब) मध्ये बॅक वॉटर आयलंड याचे वर्गीकरण यथायोग्य वाटत नाही. अशा बेटांचा समावेश अंदमान व निकोबार आणि लक्षद्विप बेटांच्या बरोबर करता येऊ शकत नाही.<br>ही सूचना करण्याचे कारण असे की समुद्र सपाटीपासून उंचीचा अभाव, जीओमॉर्फोलॉजी, समुद्राच्या पातळीतील चढउतार आणि समुद्र किनाऱ्यांची धूप हे आहे. | काम संबधित संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा राज्य सरकार यांना देण्यात यावे. | |
| १०. | जहाज मंत्रालय रस्ते आणि महामार्ग आणि मोठी बंदरे प्राधिरण | प्रस्तावित, राष्ट्रीय शाश्वत सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन मंडळ यावर जहाज उद्योग विभागास कायम स्वरुपी सदस्यत्व देण्यात यावे.<br>विमानतळांना लागू असलेला निकष जहाज बांधणी यार्ड आणि बंदराच्या विस्तारात आणि आधुनिकीकरणास लागू करण्यात यावा.<br>सागर किनाऱ्यावर असलेल्या स्पेशल इकॉनॉमिक झोनमधील उद्योगधंद्यांचा उल्लेख सागारकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने मध्ये करण्यात यावा जेणेकरुन सेझसाठी आवश्यक पर्यावरणीय मंजूरी घेणे सोपे जाईल.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये नमुद १२ नॉटीकल माइल्स स्पष्ट होत नाही.<br>के.पी.टी.कडे उपलब्ध जमीन ही मुख्यतः भरती-ओहोटीमुळे प्रभावित आणि खारफुटी व दलदलयुक्त आहे,म्हणून सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने मधील क्षेत्र-एक साठी एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना तयार करताना भविष्यातील बंदर विकास प्रकल्पांचा विचार केला जावा.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्र-दोन मधील परिच्छेद सहा (तीन) मध्ये खालील परिच्छेदाचा समावेश करण्यात यावा.<br>बंदरासारख्या आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या क्षेत्रासाठी जहाज, रस्ते आणि महामार्ग मंत्रालयाचा जहाज विभाग एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना तयार करील आणि पर्यावरण मंत्रालयास सादर करील.<br>परिशिष्ट सहा(तीन) वस्तू (दहा) बाबत सुधारणा करण्यात आली. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना,२००८ अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेमध्ये मोठ्या बंदरांना स्वतंत्रपणे हाताळण्यात यावे. सेटबॅक लाईन क्षेत्रातील बंदराच्या पाण्यातील किंवा जमनीवरील विकास कामांना एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेत कायमस्वरुपी मंजुरी देण्यात यावी, आणि त्यानंतर उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांना पुन्हा-पुन्हा मंजुरी घेण्याची आवश्यकता असू नये.<br>नैसर्गिक वायुचा अर्थ पुढीलप्रमाणे लावण्यात यावाः<br>पेट्रोलिअम किंवा केमिकल किंवा द्रवरुप नैसर्गिक गॅसची या पदार्थाची साठवणूकीची जागा आणि वायु.पुनर्भरण व्यवस्था.<br>सध्याच्या बंदरामधील सूविधांचा विकास करण्याची परवानगी राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे मिळावी.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना,२००८ मध्ये मंजुरीक्षम किंवा प्रतिबंधात्मक कामांच्या स्पष्टीकरणासह स्वतंत्र बंदर क्षेत्र तयार करण्यात यावे. यामुळे मोठी बंदरे आणि इतर बंदरासाठी एकसंघ मार्गदर्शक सुत्र तयार होईल. | |

## केंद्र सरकार

| अनु क्र. | मंत्रालय/ विभाग | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिसूचनेतबाबतचे प्रश्न | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र | शिफारस |
| | | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने नुसार क्षेत्र-तीन मध्ये ग्रीन फिल्ड मधील बंदरांचा विकास समाविष्ट आहे. इंडियन पोर्ट ॲक्ट या कायद्यानुसार केंद्र किंवा राज्य सरकारला कोणत्याही नवीन बंदराचा विकास करताना बंदराची हद्द ठरविण्याचे अधिकार आहेत. यासंदर्भात पर्यावरण मंत्रालयाकडून घेण्यात येणाऱ्या मंजूरीच्या अनुषंगाने सदर अधिसूचना कितपत प्रभावी आहे. | परिशिष्ट पाचमधील उपकलम (४) मध्ये नमूद क्षेत्र-दोन साठी तयार करण्यात येणाऱ्या एकात्मिक व्यवस्थापन योजनेमध्ये, समुद्राच्या दिशेने कोणतीही इमारत, डांबरी रस्ता किंवा सरफेस रस्ता बांधण्यास मंजुरी नाही. सदर कलमबंदर विकासाच्या हानीकारक आहे. | |
| ११ | वस्त्रोद्योग मंत्रालय | | | प्रतिक्रिया नाही. |
| १२ | पंचायत राज मंत्रालय | चोडन-मंडळ ग्राम पंचायत, तिसवाडी गोवा यांनी पारित केलेल्या प्रस्तावात असे नमुद करण्यात आले आहे की सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना १९९१ ऐवजी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना २००८ लागू केल्यास मासेमारीवर पारिणाम होईल तसेच सागरकिनाऱ्यांवर उभ्या राहणाऱ्या बांधकामांमुळे लोकांना सार्वजनिक ठिकाणच्याही सागरकिनारी, चौपाट्यांवर वावरणे कठीण होईल. म्हणून सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना जारी करण्यास स्पष्ट विरोध आहे. | ग्रामसभा सदस्यांनी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना २००८ ला मान्यता न देण्याचा प्रस्ताव मंजुर केला आहे. तसेच सध्याची सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ ची अंमलबजावणी यापुढेही अधिक परिणामकारक तरतूदींसह सुरु राहावी असाही निर्णय घेतला. | |
| १३ | संरक्षण मंत्रालय | नॅशनल हायड्रोग्राफी ऑफिसचे प्रमुख, चीफ हायड्रोग्राफर, भारत सरकार यांचा तज्ज्ञांमध्ये समावेश करण्यात यावा. | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, परिशिष्ट पाच (क्षेत्र-दोन साठी एकात्मिक व्यवस्थापन योजना) यामध्ये सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची ठिकाणं उदा. बंदर, संरक्षण विभागाचा तळ यांच्याविषयी योग्य त्या तरतूदी करण्यात याव्या. | |
| १४ | खाण मंत्रालय | | | प्रतिक्रिया नाही. |
| १५ | नियोजन आयोग | पाणथळ क्षेत्रांचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक कायदेशीर आणि आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत घटनात्मक प्राधिकरण महत्त्वाचे आहे.<br>परिशिष्ट - तीन अनुसार क्षेत्र - दोनमध्ये येणाऱ्या क्षेत्रांच्या यादीत हॉटेल आणि निवासी क्षेत्रांचा समावेश नाही.<br>परिशिष्ट - सहा अनुसार क्षेत्र - तीनमध्ये विकासकामांचा समावेश किंवा वगळणे याबाबत स्पष्टता आणणे आवश्यक आहे. | सेटबॅक लाईनच्या आखणीमध्ये बॅकवॉटरसारख्या क्षेत्रांबाबत स्पष्टीकरण नाही तसेच तलावातून समुद्रात येऊन मिळणाऱ्या पाण्यातील नौकानयनाचा अधिसूचनेत विचार व्हावा. राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातील सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या संमतीने नौकानयनास पर्यटनाचा भाग मानण्यात यावे. | |

## केंद्र सरकार

| अनु क्र. | मंत्रालय/ विभाग | समाविष्ट करण्याजोगा सूचना | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिसूचनेतबाबतचे प्रश्न | सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र | शिफारस |
| १६ | मीठ आयुक्त कार्यालय, भारत सरकार, जयपूर | राष्ट्रीय आणि राज्य/केंद्रशासित प्रदेशातील सागरकिनारा व्यवस्थापन प्राधिकरणात भारत सरकारच्या मीठ आयुक्ताचा समावेश व्हावा. | | |
| १७ | अंदमान व निकोबार केंद्रशासित प्रदेश | परिशिष्ट - एकमध्ये १७ अंदमान व निकोबार केंद्रशासित प्रदेशातील सेटबॅक लाईन अंतर्गत सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेतील क्षेत्र - चारचा समावेश करण्यात यावा. अन्यथा, सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेतील उद्दिष्टांनुसार तरतूद न केल्यास अंदमान व निकोबार बेटे जी, मानवी किंवा नैसर्गिक धोक्यांमुळे कायम असुरक्षित असतात त्यांचा एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनात समावेश करुनही काही उपयोग होणार नाही.<br>ज्याअर्थी आपल्याला हे माहित आहे की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेचे क्षेत्र - चारचे व्यवस्थापन एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेनुसार होणार असल्यामुळे क्षेत्र - चारबद्दल सविस्तर मार्गदर्शक सुत्रांची आखणी करण्यात यावी.<br>सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये सागरकिनारा व्यवस्थापनाबाबत होणाऱ्या उल्लंघनाबाबत कारवाई करणाऱ्या यंत्रणेचा उल्लेख नाही आणि योग्य त्या न्यायालयात तक्रार दाखल करणेबाबतही सुस्पष्ट प्रक्रियेचा उल्लेख नाही. | | |
| १८ | लक्षद्विप बेटे केंद्रशासित प्रदेशांतील प्रशासन | | | मान्यता आहे. |
| १९ | पाँडेचेरी केंद्रशासित प्रदेश | | कोणतीही दुरुस्ती न करता सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ अंमलात आणली पाहिजे. | विरोध आहे. |
| २० | दमण आणि दीव केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन | | | |

# परिशिष्ट चार

सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंतिम रुप देण्यासाठी प्रा.एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीच्या दि. २७ जून २००९ रोजी रुम न. ४०२, ४था मजला, पर्यावरण आणि वन मंत्रालय, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्पलेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली येथे झालेल्या पहिल्या सभेचा गोषवारा

१. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेस अंतिम रुप देण्यासाठी प्राध्या. एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीची सभा दि. २७.६.२००९ रोजी पर्यावरण आणि वन मंत्रालयात पार पाडली. या सभेला उपस्थित व्यक्तींची नावे शेवटी जोडली आहेत.

२. अध्यक्षांनी सर्व तज्ज्ञांचे स्वागत केले आणि पर्यावरण आणि वन मंत्रालयाने आखून दिलेल्या दोन मुद्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने पुढील कामांचे थोडक्यात विवेचन केले, ते मुद्दे पुढीलप्रमाणे (अ) प्रतिक्रियांचे विश्लेषण आणि (ब) धोरण व कायदेशीर चौकट आखण्यासंदर्भात सल्ला देणे.

३. अध्यक्षांनी त्यांच्या सुरुवातीच्या भाषणात कोणतीही अधिसूचना आखताना पुढील चार मुद्यांना आधारभूत मानण्यावर भर दिला-

अ) मच्छिमार आणि सागरकिनारी राहणाऱ्या इतर जनसमुहांचे रक्षण आणि त्यांच्या उपजीविकेला बळकटी आणणे.

ब) जैवकवच आणि जैविक विविधतेच्या संवर्धनामार्फत सागरकिनारा क्षेत्राच्या पारिस्थितिकीय सुरक्षेला अधिक मजबूत करणे.

क) रामसार क्षेत्र आणि ऑलिव्ह रिडले सागरी कासव प्रजनन क्षेत्रासह सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा लाभलेल्या क्षेत्रांचे संवर्धन करणे.

ड) जागतिक तापमानवृद्धीमुळे समुद्राच्या पातळीत होणारी वाढ तसेच सतत होणारी चक्रीवादळे आणि त्सुनामी लाटांच्या संकटाचा सामना करण्यासाठी सागरकिनाऱ्यांवरील जनसमुहांच्या क्षमता वाढविणे.

४. आपल्या सुरुवातीच्या भाषणानंतर अध्यक्षांनी सन्माननीय पर्यावरण आणि वनमंत्री, श्री.जयराज रमेश यांना समितीला उद्देशून मार्गदर्शन करण्यास सांगितले. मंत्री महोदयांनी समितीच्या सदस्यांचे स्वागत केले आणि अध्यक्षांनी आपल्या सुरुवातीच्या भाषणात म्हटल्याप्रमाणे मच्छिमार आणि सागरकिनारी राहणाऱ्या इतर जनसमुहांच्या कल्याणाचा पाया सागरकिनारा क्षेत्र नियमन/व्यवस्थापन अधिसूचनेद्वारे गातला जावा असे आवाहन केले. आपल्या संक्षिप्त भाषणानंतर मंत्री महोद्यांनी समितीच्या सदस्यांचे आभार मानले व पर्यावरण आणि वन मंत्रालयाचे सचिव, श्री.विजय शर्मा यांच्यासह प्रयाण केले.

५. अध्यक्षांनी, अतिरिक्त संचालक, डॉ. ए.सेंथिल वेल यांना थोडक्यात सादरीकरण करण्याची विनंती केली. डॉ.ए.सेंथिल वेल यांनी आपल्या सादरीकरणात सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना आणि सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र

अधिसूचनेच्या मसुद्यावर प्राप्त झालेल्या सूचना आणि हरकतच्या मुद्यांशी निगडीत प्रश्नांबाबत स्पष्टीकरण केले. यामध्ये, नॅशनल फिशवर्कर्स फोरमचे दि. २७.६.२००९ चे पत्र, मत्सव्यवसाय व नोंदणी मंत्र्यांचे पत्र, केरळ सरकारचे दि. ९.६.२००९ चे पत्र, गोव्याचे मुख्यमंत्र्यांचे पत्र, अंदमान व निकोबार आणि लक्षद्विप बेटांच्या व्यवस्थापनासंदर्भातील अधिसूचनेच्या मसुद्यासह १०.६.२००९ चे पत्र सदस्यांना वितरीत केले.

६. या सादरीकरणानंतर, अध्यक्षांनी,पर्यावरण शिक्षण केंद्र संस्थेचे संचालक, श्री.कार्तिकेय व्ही. साराभाई यांना आपले विचार मांडण्यास सांगितले. या सभेसाठी विशेष निमंत्रीत असलेल्या श्री. साराभाई यांच्या पर्यावरण शिक्षण केंद्र संस्थेला पर्यावरण आणि वन मंत्रालयाने सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मसुद्यावर जन-परिसंवादाच्या माध्यमातून स्थानिक जनसमूहांशी संवाद साधून आपला अहवाल मंत्रालयास सादर करण्याची जबाबदारी दिली होती. आपल्या भाषणात श्री.साराभाई यांनी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मसुद्यावर स्थानिक जनसमुहांबरोबर आयोजित जन-परिसंवादात उपस्थित करण्यात आलेल्या मुख्य प्रश्नांविषयी माहिती दिली. श्री.साराभाई यांनी अनेक सूचना आणि हरकतींबद्दल सविस्तर स्पष्टीकरण केले. त्यांपैकी काही मुख्य प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे-

अ) सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना कायम ठेवावी आणि त्यामध्ये सुधारणा आणावी. सेटबॅक लाईन, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र, एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापनच्या पद्धती, इ. गोष्टींबद्दल स्पष्टता यावी.

ब) सध्याच्या सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मध्ये काही सुधारणा आणून प्रभावी अंमलबजावणी केली आणि उल्लंघनकर्त्यांना कठोर शासन केले तर सागरकिनाऱ्यांचे परिणामकारक व्यवस्थापन करण्यास पुरेसा वाव आहे.

क) सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मसुद्याची निर्मिती आणि बांधणी करण्यात विविध संबधीतांचा विशेषतः स्थानिक जनसमूहाचा सहभाग घेणे.

ड) सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्ये सूचित करण्यात आलेल्या नविन व्यवस्थापन पद्धतीने त्यामधील तरतुदींचा अर्थ प्रत्येक जण आपापल्या समजेनुसार लावू शकेल आणि त्याचा व्यापारी हेतूने प्रेरित गोष्टींसाटी कायदेशीर वापर करु शकेल या शक्यतेस वाव ठेवला आहे.

इ) सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मुळे विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) प्रकल्पांचा पुरस्कार होईल आणि स्थानिक जनसमूहांचे मुलभूत हक्क डावलून उद्योग क्षेत्राला सागरकिनाऱ्यावरील जमीन आणि संसाधनांचा वापर करण्यास वाव मिळेल.

फ) सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या व्यवस्थापन पद्धतीमध्ये आणि रचनेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य सरकारची जबाबदारी व भूमिका पुरेशा प्रमाणात मांडलेली नाही. प्रस्तावित, एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेच्या प्रक्रियेत स्थानिक जनसमुहांना आपले प्रतिनिधीत्व पंचायत सदस्यांमार्फत करण्यासाठी तसेच स्थानिक पर्यावरण आणि लोकवस्तीच्या क्षेत्रांबद्दल कामाचे नियोजन करण्यास वाव ठेवलेला नाही.

ग) सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या मूळ उद्दिष्टांना हरताळ फासणाऱ्या अनेक दुरुस्त्या

पाहता, सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ मध्येही अशाच दुरुस्त्या होऊन त्याचे दुष्परिणाम मच्छिमारांना भोगावे लागतील अशी भीती आहे.

ह) सागरकिनारा परिसंस्था आणि पारंपारिक सागरकिनारा रहिवाशी जनसमूहांच्या मुलभूत हक्कांचे संरक्षण करणारा कायदा तयार व्हावा. विधीमंडळातील लोकप्रतिनिधींनी सागरकिनाराविषयक धोरणांवर चर्चाविर्मष करण्यास सुरुवात करुन कायद्याच्या निर्मितीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकावे.

च) सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमध्ये शिक्षण, सामाजिक संघटन, नियमन आणि लोकसहभागाचाही समावेश करावा यावर त्यांनी भर दिला.

७. श्री. साराभाई यांनी आपल्या भाषणाच्या समारोपात असे म्हटले की मच्छिमारांना सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना १९९१ हवा आहे कारण त्यामधील ५०० मीटरच्या नियमन क्षेत्राबद्दल ते समाधानी आहेत. ही ५०० मीटरची हद्द ते समजून त्याप्रमाणे योग्य ती काळजी घेऊ शकतात. त्यांनी पर्यावरण आणि वन मंत्रालयास अशीही विनंती केली की हा अहवाल लोकांसमोर जाहीर करावा.

८. समितीने या सभेत, विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण आणि वनेविषयक संसदीय समितीने मांडलेल्या निरिक्षणांबाबत चर्चा केली. समितीने नोंदवून घेतलेल्या काही शिफारसी पुढीलप्रमाणे-

अ) धोरण आखणीसाठी वरुन खाली पद्धतीने जाण्यापेक्षा खालून वर पद्धतीने गेल्यास लोकसहभाग साध्य करता येईल.

ब) संपूर्ण देशाच्या सागरकिनाऱ्याला एकसमान व्यवस्थापन योजना लागू करणे व्यवहार्य नाही. समितीला असे वाटते की प्रत्येक राज्यातील वैविध्यपूर्ण लोकसंस्कृतीचा विचार करुन त्यानुरुप वेगवेगळ्या योजनेचा आराखडा तयार व्हावा. यासाठी, एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजनेच्या आखणीत राज्य सरकारांना पुरेसा सहभाग मिळावा.

क) शाश्वत सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन मंडळामध्ये स्वयंसेवी संस्था, मच्छिमारांचा सहभाग असावा.

ड) धोरणामध्ये, सागरकिनारी राहणाऱ्या जनसमुहांतील गरीब आणि वंचित घटकांचाही विचार व्हावा.

इ) मुख्यतः मच्छिमार/सागरकिनारी राहणाऱ्या जनसमुहांच्या हिताबद्दल उपस्थित समस्यांचे निराकरण करण्यापूर्वी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंमलात आणण्याची घाई करु नये.

फ) स्थानिक जनसमूहांचा सहभाग, निर्णय प्रक्रियेत विचारणा आणि नियंत्रणाची साधने या माध्यमातून सागरकिनारी राहणाऱ्या जनसमुहांचा विश्वास संपादण करणारी यंत्रणा/साधने, कायदा आणेपर्यंत सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना २००८ प्रलंबित ठेवणे.

९. सेंटर फॉर सायन्स अँड एनव्हायमेंट संस्थेच्या संचालक, श्रीम.सुनिता नारायण यांनी असे मत व्यक्त केले की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना महानगरपालिका क्षेत्रात ५०० मीटर क्षेत्राच्या तरतूदीचा पुरस्कार करीत या अधिसूचनेत काही महत्त्वाच्या प्रश्नांबाबत सुधारणा आणण्याचे मत व्यक्त केले.

१०. अर्थ सायन्स मंत्रालयाचे सचिव,डॉ. शैलेश नायक यांनी जलीय क्षेत्र नियमनाअंतर्गत आणण्याबद्दल मंत्रालयाचे अभिनंदन केले कारण सागरकिनाऱ्याचे पर्यावरण निश्चित करण्यात जलीय चैतन्य महत्त्वाची भूमिका बजावत असते.

११. अतिरिक्त सचिव, श्री. जे. एम.माऊस्कर म्हणाले की सागरकिनारी राहणाऱ्या जनसमूहांना सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ ची व्यवस्थित कल्पना आहे. म्हणून, एखादी नवी अधिसूचना आणण्याऐवजी सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना १९९१ अधिक सुधारीत रुपात अंमलात आणणे योग्य ठरेल.

१२. कोस्टल सिस्टम रिसर्च, एम.एस.एस.आर.एफ चे संचालक डॉ. व्हि. सेल्वम यांनी असा मुद्दा लक्षात आणून दिला की मच्छिमारांना वाटते की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंमलात आल्यास सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या तरतूदींचे उल्लंघन केलेली कामे नियमित करुन घेण्यात येतील, मच्छिमार आणि त्यांची राहती घरे सागरकिनाऱ्यांवर येणाऱ्या विकासप्रकल्पांमुळे उखडून मागे फेकली जातील.

१३. सविस्तर चर्चेअंती समितीने विचारात घेतलेले महत्त्वाचे प्रश्न/मुद्दे पुढीलप्रमाणे-

१. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना स्थानिक जनसमुहांना नीट कळलेली नाही आणि त्यामधील अनेक शास्त्रीय संकल्पना किंवा संज्ञा अस्पष्ट आहेत आणि कदाचित त्यांचा हवा तसा अर्थ लावून गैरवापर केला जाईल.

२. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेचा भर असुरक्षित रेषा ठरविण्यावर आहे, जी १) भरती-ओहोटी २) लाटा ३) सद्यस्थिती किंवा हवामान बदलामुळे समुद्राच्या पातळीत होणारी वाढ आणि ४) किनाऱ्यांचे विस्थापन या चार गोष्टींवर आधारलेली आहे. आता, असुरक्षित रेषा ही प्रत्येक भोगोलिक क्षेत्राप्रमाणे वेगवेगळी असेल, त्यामुळे लोकांना किंवा कोणालाही सरसकट सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेनुसार नियमन करणे कठीण जाईल. असुरक्षित क्षेत्राची रेषा जरी आखून घेतली तरी ती आखून घेईपर्यंत गेलेल्या कालावधीत अचानक मोठ्या प्रमाणात विकासप्रकल्प समुद्रकिनारी उभे राहिल्याचे चित्र दिसेल.

३. याबाबत मान्यता आहे की जमिनीवरील क्षेत्रामध्ये नियंत्रण ठेवण्याप्रमाणेच पाण्याच्या क्षेत्रातही विशेषतः भरतीओहोटीमुळे प्रभावित आतील जलीय क्षेत्र तसेच समुद्राकडील जलीय क्षेत्र यांचा समावेश सागरकिनारा व्यवस्थापनात व्हावा. पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राला असेही जमिनीच्या दिशेने किंवा समुद्राच्या दिशेने असले तरी संरक्षण द्यावेच लागते.

४. सुदरबन क्षेत्राची विशेष दखल घेणे आवश्यक आहे कारण हे फक्त पर्यावरणीदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र नाही तर समुद्राच्या पातळीत होणाऱ्या वाढीमुळे पाण्याखाली जाण्याचा धोका असलेले आणि अगदी अलिकडच्या आलेल्या चक्रिवादळामुळे अपरिमित नुकसान सहन करावे लागलेले क्षेत्र आहे. सुंदरबनमध्ये राहणाऱ्या लोकांना जिवीत हानी आणि संपत्तीच्या नुकसानाचा फटका बसला आहे.

५. चिलका, पुलिकत,पिचावरम, मन्नारचे आखात, वेम्बनाड, कोरिंगा, कच्छचे आखात अशा पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांच्या संवर्धनासाठी विशेष लक्ष दिले गेले पाहिजे. सविस्तर चर्चेअंती समितीचे असे मत झाले की या क्षेत्रांना अत्यंत असुरक्षित सागरकिनारा क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावे जेणे करुन त्यांच्या संवर्धन व संरक्षणासाठी व्यवस्थापन

योजना बनेल.

६. सेंटर फॉर एनव्हायरमेंट अँड डेव्हलपमेंट या संस्थेला मंत्रालयाने पर्यावरणीदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे व्यवस्थापन आणि त्यांच्या जैविक आवरणाची हद्द ठरविण्याची जबाबदारी सोपविली आहे. समितीने त्यांच्याकडून या बाबतचा अहवाल लवकरात लवकर मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली.

७. समुद्रकिनारे विशेषतः चौपाट्या, पुळण यांना धूप होऊन नष्ट होण्याचा खूप धोका आहे व त्यामुळे समुद्रकिनाऱ्यांचे रुपच बदलले जाईल. याचे कारण नैसर्गिक तसेच मानवनिर्मितही असू शकते उदा.बंदर, जेट्टी,ग्रॉयन्स, किनारा संरक्षण यंत्रणा, इ. असेही लक्षात आणून देण्यात आले की नजिकच्या काळात केंद्र सरकार/राज्य सरकार संपूर्ण समुद्रकिनाऱ्यावर ठिकठिकाणी बंदर उभारण्याच्या तयारीत आहे. शास्त्रीय अध्ययनाशिवाय असे प्रकल्प उभारले गेल्यास कधीही न भरुन येणारी हानी संभवते. एखाद्या प्रकल्पाचा सतत होणारा परिणाम अभ्यासला जावा आणि त्यापासून किनाऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी धोरण आखले जावे.

८. अंदमान व निकोबार आणि लक्षद्विप बेटांचे संरक्षण करण्यासाठी उचित मार्ग म्हणजे या बेटांना देशाच्या इतर सागरकिनाऱ्यांपासून वेगळे काढून पाहिले जावे. अशा स्थितीत, या बेटांना सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना मधून बाजूला काढून द्विप संरक्षण क्षेत्र (आयलंड प्रोटेक्शन झोन नोटीफिकेशन)अधिसूचना तयार करुन स्वतंत्रपणे हाताळता येईल.अशी अधिसूचना अध्यक्षांनी आपल्या सुरुवातीच्या भाषणात मांडलेल्या तत्त्वांनुसार बनवून चर्चेला आणता येईल. येत्या सभांमध्ये या मुद्यावर चर्चा करण्यावर समितीमध्ये सहमती झाली.

१४. समितीने अशी अपेक्षा व्यक्त केली की एक तक्ता बनविण्यात यावा ज्यामध्ये एका बाजूला सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेतील तरतूदी असतील आणि दुसऱ्या बाजूला त्या अनुषंगाने करावयाचे बदल मांडलेले असतील.

१५. समितीने अशी इच्छा व्यक्त केली की पर्यावरण शिक्षण केंद्र संस्थेने घेतलेल्या जन-परिसंवादाचा अहवाल संक्षिप्त स्वरुपात मंत्रालयाच्या वेबसाईटवर ठेवावा.

१६.१ सल्लागार, डॉ.नलिनी भट यांनी समितीला अशी माहिती दिली की केंद्रिय माहिती आयोगाच्या आदेशानुसार मंत्रालयाने अधिसूचनेचा मसुदा जाहीर करण्यापूर्वीच मते आजमवली पाहिजेत.

१६.२ समितीचे असे मत होते की स्थानिक जनसमूह आणि स्वयंसेवी संस्थाचा आवाज ऐकला गेला पाहिजे. म्हणून असे ठरले की ज्या मच्छिमार किंवा स्वयंसेवी संस्थांनी सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या मसुद्यावर सूचना किंवा आक्षेप नोंदविले आहेत त्यांना समितीसमोर आपले म्हणणे मांडण्यासाठी निमंत्रित केले जाईल.

१६.३ त्याचप्रमाणे, केंद्रिय आणि राज्य सरकारांबरोबर चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला. समितीने यासाठी ७ जुलै २००९ तारखेला पर्यावरण आणि वन मंत्रालयामध्ये केंद्र व राज्य सरकारांबरोबर सभा घेण्याचे निश्चित केले.

१६.४ समिती त्याचबरोबर, चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज असोसिएशन, इ. बरोबर ८ जुलै २००९ रोजी पर्यावरण आणि वन मंत्रालयात सभा घेईल.

सभेचे कामकाज चालविण्याबद्दल अध्यक्षांचे आभार मानून सभा संपली.

## सभेतील उपस्थितांची यादी.

१. प्रोफेसर. एम.एस.स्वामिनाथन,चेअरमन, एम.एस.स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन (एम.एस.एस.आर.एफ.) तिसरा क्रॉस स्ट्रीट, इन्स्टिटट्यूशनल एरिया, तारामणी, चेन्नई.

२. डॉ. शैलेश नायक, सेक्रेटरी, डिपार्टमेंट ऑफ ओशन डेव्हलपमेंट, महासागर भवन, ब्लॉक-१२, सी.जी. ओ.कॉम्प्लेस, लोधी रोड, न्यू दिल्ली-११००३.

३. श्रीमती. सुनिता नारायण, सेन्टर फॉर सायन्स अ‍ॅन्ड एनव्हायरमेंट, ४१, तुघलकबाद इन्स्टिटट्यूशनल एरिया, न्यु दिल्ली – ११००६२.

४. श्री. जे.एम.माऊस्कर, अ‍ॅडिशनल सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट अ‍ॅन्ड फॉरेस्ट,न्यु दिल्ली.

५. डॉ. नलिनी भट, अ‍ॅडव्हायसर, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट अ‍ॅन्ड फॉरेस्ट,न्यु दिल्ली.

६. श्री. कार्तिकेय साराभाई, सीईई, अहमदाबाद.

७. डॉ. व्ही.सेल्वन, डॉयरेक्टर, कोस्टल सिस्टम रिसर्च,एम.एस.स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन (एम.एस.एस.आर.ए), तिसरा क्रॉस स्ट्रीट, तारामणी इन्स्टिटट्यूशनल एरिया, चेन्नई.

८. श्री.पी.मदवेश्वरन, डायरेक्टर, डिपार्टमेंट ऑफ ओशन डेव्लपमेंट, महासागर भवन, ब्लॉक १२, सी.जी.ओ.कॅम्प्लेक्स, लोधी रोड, न्यु दिल्ली-११०००३

९. डॉ. ए. सेंथिल वेल, अ‍ॅडीशनल डायरेक्टर, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट अ‍ॅन्ड फॉरेस्ट, न्यु दिल्ली.

**सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंतिम रुप देण्यासाठी प्राध्या.एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीच्या दि. ०७ जुलै २००९ रोजी रुम न. ४०२, ४था मजला, पर्यावरण आणि वन मंत्रालय, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्पलेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली येथे झालेल्या दुसऱ्या सभेचा गोषवारा**

१. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेस अंतिम रुप देण्यासाठी प्रा. एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीची सभा दि. ०७.०७.२००९ रोजी पर्यावरण आणि वन मंत्रालयात पार पाडली. या सभेला उपस्थित व्यक्तींची नावे शेवटी जोडली आहेत. केंद्र आणि राज्य सरकारकडून यापूर्वीच मिळालेल्या प्रतिक्रियांचे संकलित टीपण सदस्यांना वाटण्यात आले.

२. पहिल्या सभेचा गोषवारा वाचून दाखविण्यात आला आणि त्यामध्ये आवश्यक ते बदल सदस्यांनी सूचविले त्याची नोंद घेण्यात आली.

३. अध्यक्षांनी सर्व केंद्र आणि राज्य सरकारातील प्रतिनिधींचे स्वागत केले व सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेबाबत मत मांडण्यास सांगितले.

४. न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या अधिकाऱ्यांनी असे मत मांडले की अणुऊर्जा निर्मिती, किनाऱ्यांवरील आण्विक खनिजांचे खाणकाम अशा काही कामांची विशेष दखल सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये घेतली गेली पाहिजे. चौपाट्यांमध्ये थोरिअमचे साठे असताता त्यांना माणसे लावून काढण्याची तरतूद संपूर्ण किनाऱ्यास लागू करण्यात यावी. समितीला असे लक्षात आणून देण्यात आले की एकदा अणुभट्टी किनाऱ्यावर स्थापित झाली की मच्छिमारांना समोरील समुद्रात मासेमारी करण्याची परवानगी असते. अणुभट्टीच्या कुलींग वॉटरमुळे मासेमारीवर काही परिणाम झाल्याविषयी अहवाल उपलब्ध नाही. या अधिसूचनेत लष्करी तळाला ज्याप्रमाणे नमूद केले आहे त्याचप्रमाणे अणूऊर्जा प्रकल्पांनाही मानण्यात यावे. अणुऊर्जा विभागाकडून एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना तयार करुन केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाची त्यावर मंजुरी घेतली जाईल.

५. जहाज मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी असे मत मांडले की ज्याप्रकारे सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ च्या क्षेत्र-एक मध्ये ग्रीनफिल्ड एअरपोर्टचा समावेश आहे त्याचप्रमाणे बंदराचाही समावेश व्हावा. असे सुचित करण्यात आले की जहाज मंत्रालयातर्फे एकात्मिक सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन योजना तयार करुन केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालयाची त्यावर मंजुरी घेतली जाईल. चर्चेमध्ये असा मुद्दा आला की बऱ्याचदा बंदराजवळ दुसरे एखादे मोठे काम सुरु असते ज्याची कल्पना बंदर विभागालाच नसते. समितीला ही गोष्ट अत्यंत गंभीर वाटते कारण अशा विसंवादामुळे एखाद्या महाकाय कामाचा दुष्परिणाम तेथिल पर्यावरण, समुद्रकिनारा, स्थानिक लोक यांच्यावर होत असूनही त्याकडे दुर्लक्ष होऊ शकते. म्हणून समिती असा पुनरुच्चार करते की संपूर्ण सागरकिनाऱ्यांवरील बंदर प्रकल्पांमुळे होणाऱ्या परिणामांचा सर्वसमावेश अभ्यास करण्यात यावा.

६. नगर विकास मंत्रालयाच्या नगररचना विभागातील अधिकाऱ्याने सेटबॅक लाईन ठराविक वेळेत आखून पूर्ण करावी असे मत मांडले आणि हे करताना समुद्राच्या पातळीत होणारी वाढ आणि

स्थानिक वैशिष्ट्यांचाही विचार व्हावा. त्याने असेही मत मांडले की राष्ट्रीय शाश्वत सागरकिनारा व्यवस्थापन मंडळात अंदमान व निकोबार बेटावरील आदिवासी व मच्छिमार जनसमुहांच्या पुढाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

७. कृषी मंत्रालयाच्या अधिकाऱ्याने मारीकल्चर आणि ॲक्वाकल्चरला कोस्टर ॲक्वाकल्चर ॲक्ट या कायद्यानुसार नियमित करण्याची मागणी केली. अक्वाकल्चर प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना राष्ट्रीय शाश्वत सागरकिनारा व्यवस्थापन मंडळावर सदस्य म्हणून घेण्यात यावे असे मत मांडले. त्याने अधिसूचनेतील ड्रेजिंग आणि मच्छिमारांसाठी बंदर बांधण्याच्या कामाबद्दल काही चुका असल्याचे निदर्शनास आणून दिले, ज्यांना सुधारण्याची अपेक्षा केली.

८. दमण आणि दिवचे खासदार, श्री लालूभाई पटेल यांनी दमण-दीवचे प्रतिनिधित्व करीत असे मत मांडले की दमण-दीवला फारच छोटा सागरकिनारा लाभला आहे. एका बाजूला समुद्र तर दुसऱ्या बाजूला छोट्या-छोट्या नद्या आणि खाडी असलेल्या भागात सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेचे क्षेत्र-एक लागू असल्यामुळे विकासाची कामे खोळंबली आहेत. त्यांनी अशी विनंती केली की क्षेत्र-एक मध्ये मोडणारे जंगल वगळता बाकी दमण-दीवचा समावेश क्षेत्र-दोन मध्ये करण्यात यावा. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या क्षेत्रात स्मशानभूमी बांधण्याची परवानगी मिळावी अशीही विनंती त्यांनी केली.

९. गुजरात सरकारचे प्रतिनिधी श्री.नंदा यांनी म्हटले की सेटबॅक लाईन आखण्यासाठी बराच काळ जाईल आणि तेवढ्या काळात सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेच्या असुरक्षित क्षेत्र रेषासुद्धा आखता येणार नाही. त्यामुळे या काळात जी नियमनाची पोकळी राहील त्याचा फायदा घेत अनेक उल्लंघने होतील. सागरकिनारा व्यवस्थापनात समुद्राकडील क्षेत्राचा समावेश केल्याबद्दल त्यांनी प्रशंसा केली. त्यांनी असेही मत मांडले की खारफुटीच्या जंगलाला अजिबात हात लावू नये आणि तिथे राहणाऱ्या लोकांना खारफुटी संवर्धनाच्या कार्यात जोडून घेतले जावे. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र-दोन आणि क्षेत्र-तीन यामध्ये नमुद केलेल्या बंदर विषयक कामांमध्ये बरीच तफावत असल्याचे त्यांनी दाखवून दिले. तसेच क्षेत्र-तीन मध्ये डेजिंगचे काम वेगळे दाखविण्यात आले आहे. त्यात सुधारणा करावी. सागरकिनारा क्षेत्रातील प्रकल्पांना चार वेगवेगळ्या प्रकारच्या मंजूरीतून जावे लागते. ती प्रक्रिया अतिशय वेळखाऊ आहे म्हणून त्यांनी अशी विनंती केली की ही मंजूर प्रक्रिया एक खिडकी प्रकारे दिली जावी.

१०. कर्नाटक राज्यातील अधिकाऱ्यानेसुद्धा अशी भीती व्यक्त केली की असुरक्षित क्षेत्र रेषा ठराविक वेळेच्या मर्यादेत आखली जाईल की नाही. सागरकिनाऱ्यांवरील योजना आणि प्रकल्पांना मंजुरी मिळण्यासाठी सागर तट लाभलेल्या राज्यांचे प्रतिनिधी राष्ट्रीय मंडळावर घेणे आणि सागरकिनारा क्षेत्र-दोन मध्ये लोकसंख्येची घनता ठरविण्याचा निकष सन २००० च्या जनगणेनुसार ठरविण्यात यावा. सागरकिनाऱ्यावरील प्रकल्पांना मंजुरी मिळण्याबाबत त्यांनी एक खिडकी योजना राबविण्याची विनंती केली.

११. तामिळनाडू सरकारतर्फे उपस्थित श्री. अण्णामलाई यांनी असे सांगितले की तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी पत्र लिहून या अधिसूचनेवर लोकांच्या सूचना आणि हरकती मागविण्यासाठी अधिक वेळ मागितला आहे तसेच या अधिसूचनेला तामिळ भाषेतून उपलब्ध करुन देण्याची सूचना केली आहे. त्यांनी असे सूचविले की असुरक्षित क्षेत्र रेषा आखलेल्या जमिनीकडील

जागेमध्ये विकास योजना अंमलात आणण्यास मनाई करणे. हे शहरांच्या विकासावर विपरित परिणाम करणारे ठरेल. त्यांनी पुढे असेही सुचविले की जंगलाशी संबधित कामांना मंजूरी मिळविण्याची आवश्यकता नसावी.

१२. सिडकोचे श्री.जी.एस.गिल यांनी सूचविले की, मुंबईसारख्या महानगरांना विशेष दर्जा देण्यात यावा आणि त्यांच्या विकासांसंबधीत नियमाचे अधिकार तेथील स्थानिक शहर नियोजन यंत्रणेकडे असावेत. शहरातील विकासावर बंदी आणणे या शहरांच्या विकासाला मारक ठरेल आणि अशा शहरांमध्ये ग्रामीण लोकांचे स्थलांतर रोखता येते शक्य नाही. पुरपरिस्थितीवर नियंत्रण आणण्यासाठी पाण्यातील खारफुटी काढून टाकण्याची परवानगी मिळावी. श्री. गिल यांनी मुंबईतील झोपड्या आणि मोडकळीस आलेल्या घरांच्या समस्येविषयी माहिती दिली व लोकांना चांगली घरे उपलब्ध करुन देण्यासाठी गृहबांधीणीचे राष्ट्रीय धोरण अंमलात आणण्याचे सूचविले. त्यांनी अशी मागणी केली की, समुद्रकिनाऱ्यावरील किंवा जमिनीकडील असुरक्षित क्षेत्र रेषेवरील चटई क्षेत्र निर्देशांक गोठविण्यात येऊ नये आणि तो विकास नियंत्रण नियमावलीनुसार ठरविण्यात आला. त्यांनी असे ही सूचविले की, असुरक्षित क्षेत्र रेषा ठरविण्यात स्पष्ट मार्गदर्शक तत्वे असवीत आणि ती एकाच संस्थेकडून आखून घेण्यात यावीत. या रेषेसंदर्भातील माहिती आणि नकाशे पर्यावरण आणि वनमंत्रालयाने नकाशे डीजीटल स्वरुपात आणि मोठ्या मापाचे असावेत.

१३. अध्यक्षांनी सर्व अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर त्यांच्या प्रतिक्रिया योग्य त्या पद्धतीने विचारात घेतल्या जातील असे सांगितले.

सभेचे कामकाज चालविण्याबद्दल अध्यक्षांचे आभार मानून सभा संपली.

## सभेतील उपस्थितांची यादी. (७.७.२००९)

१. प्रोफेसर. एम.एस.स्वामिनाथन,चेअरमन, एम.एस.स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन (एम.एस.एस.आर.एफ.) तिसरा क्रॉस स्ट्रीट, इन्स्टिटयूशनल एरिया, तारामणी, चैन्नई.

२. डॉ. शैलेश नायक, सेक्रेटरी, डिपार्टमेंट ऑफ ओशन डेव्लपमेंट, महासागर भवन, ब्लॉक-१२, सी.जी. ओ.कॉम्प्लेस, लोधी रोड, न्यू दिल्ली-११००३.

३. श्रीमती. सुनिता नारायण, सेन्टर फॉर सायन्स ॲन्ड एनव्हायरमेंट, ४१, तुघलकबाद इन्स्टिटयूशनल एरिया, न्यु दिल्ली – ११००६२.

४. श्री. जे.एम.माऊस्कर, ॲडिशनल सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट ॲन्ड फॉरेस्ट,न्यु दिल्ली.

५. डॉ.नलिनी भट, ॲडव्हायसर, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट ॲन्ड फॉरेस्ट,न्यु दिल्ली.

६. डॉ. ए. सेन्थिल वेल, ॲडिशनल डायरेक्टर, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट ॲन्ड फॉरेस्ट, न्यू दिल्ली.

७. डॉ. जितेंद्र सिंग, एन.पी.सीआय.एल,मुंबई.

८. श्री.ए.बी.अवटी,सायन्टिफिक ऑफिसर-जी डिपार्टमेंट ऑफ ॲटोमिक एनर्जी, स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग ग्रुप, अणुशक्ती भवन, सी. एम.मार्ग, मुंबई - ४००००१.

९. श्री.सी.बी.जैन, प्रोजेक्ट डायरेक्टर (जे.एन.पी.बी), न्यक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, २. ई.एन.टी ब्लॉक, नव अणुशक्ती नगर, मुंबई.

१०. कॅप्टन सुभाष कुमार, चेअरमन, चेन्नई पोर्ट ट्रस्ट, चेन्नई, तामिळनाडू.

११. श्रीमती. मितू जोशी, डेप्युटी सेक्रेटरी (पोर्ट डेव्हलपमेंट), मिनिस्ट्री ऑफ शिपिंग.

१२. श्री.जी.पी.राय, मॅनेजर- (पी-पी-डी) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, ॲडमन बिल्डींग शेवा, ता. उरण, नवी मुंबई - ४००७०७.

१३. श्री. उडित रत्ना, टाऊन ॲन्ड कंट्री प्लॅनर, टाऊन ॲन्ड कंट्री प्लॅनिंग ऑर्गनायझेशन, इ.ब्लॉक, विकास भवन, आयपी. इस्टेट,न्यु दिल्ली-२.

१४. श्री. सतीश कुमार, पी.एम, सिनिअर इंजिनिअर, सिव्हिल, कोचिन पोर्ट ट्रस्ट.

१५. श्री. पी. महेश्वरन, सायन्टिस्ट-एफ, मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सेस, न्यू दिल्ली.

१६. श्री. शंकर एस. डेप्युटी कमिशनर (फिशिंग हार्बर) मिनिस्ट्री ऑफ ॲग्रीकल्चर डिपार्टमेंट ऑफ ॲनिमल हजबन्ड्री, डेअरिंग ॲन्ड फिशरीज, कृषी भवन, न्यू दिल्ली.

१७. डॉ. आर. अण्णामलाई, डायरेक्टर, एनव्हायरमेंट डिपार्टमेंट, पनगल बिल्डींग, सैदपेट, चेन्नई, तामिलनाडू.

१८. श्री. कंवर पाल, सेक्रेटरी (इकॉलॉजी ॲन्ड एनव्हायरमेंट), गव्हरमेंट ऑफ कर्नाटक, बॅंगलोर.

१९. श्रीमती उमा अडूसुमिती, चीफ प्लॅनिंग डिव्हिजन, एम.एस.आर.डी.ए, मुंबई.

२०. श्री. एस.के.नायडू, प्रिन्सीपल सेक्रटरी, गुजरात.

२१. श्री. लालूभाई पटेल, दमन ॲन्ड दिव, मेंबर ऑफ पार्लेमेंट, लोकसभा

२२. श्री.जी.एस.गिल.वाईस सी.एम.डी.सिडको, नरिमन पॉईंट, मुंबई.

**सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंतिम रुप देण्यासाठी प्राध्या.एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीच्या दि. ०८ जुलै २००९ रोजी रुम न. ४०२, ४था मजला, पर्यावरण आणि वन मंत्रालय, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्पलेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली येथे झालेल्या तिसऱ्या सभेचा गोषवारा**

१. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेस अंतिम रुप देण्यासाठी प्रा. एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीची सभा दि. ०८.०७.२००९ रोजी पर्यावरण आणि वन मंत्रालयात पार पाडली. **केंद्र आणि राज्य सरकारकडून यापूर्वीच मिळालेल्या प्रतिक्रियांचे संकलित टीपण सदस्यांना वाटण्यात आले.** या तिसऱ्या सभेसाठी चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री असोसिएशन यांना निमंत्रित करण्यात आले होते. सभेचा उपस्थित राहिलेल्या व्यक्तींची यादी सोबत शेवटी जोडलेली आहे.

२. दिनांक २७.६.०९ रोजी झालेल्या क्षेत्राचा गोषवारा आणि द्विप संरक्षण क्षेत्र अधिसूचनेचा मसुदा सर्वांना वाटण्यात आला.

३. अध्यक्षांनी सभेला उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ विषयी प्रतिक्रिया व्यक्त करण्यास सांगितले.

४. तामिळनाडूतील सी.आर.इ.डी.ए.आय.च्या सदस्यांनी असे सूचविले की, असुरक्षित क्षेत्र रेषा आखण्याची जबाबदारी स्थानिक सरकारला असावी. तसेच सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये गृहबांधणीच्या विषयी स्पष्ट उल्लेख केलेला नाही म्हणून त्याचा समावेश केला जावा. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्रा मध्ये प्रति चौरस किलोमीटर या चारशे व्यक्तींच्या घनतेचा निकष अधिक स्पष्ट करण्याची गरज आहे.

५. केरळ बिल्डर असोशिएशनच्या सदस्याने केरळमधील बॅकवॉटर क्षेत्राला वेगळे काढून पाहण्याची गरज व्यक्त केली कारण केरळमध्ये समुद्रकिनाऱ्यापेक्षा बॅकवॉटरचे क्षेत्र जास्त आहे आणि तिथे लोकसंख्याही भरपूर आहे. त्यांनी मंत्रालयास अशी विनंती केली की सेटबॅक लाईन आखण्यासाठी मार्गदर्शक सूत्रे तयार करावी आणि यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य देण्यात यावी.

६. सी. आर.ई.डी.आय.च्या मुंबईतील सदस्याने असे सांगितले की मुंबईतील ६०% लोकं झोपडपट्ट्यांमध्ये राहतात आणि जवळजवळ १६००० जुन्या इमारती सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमध्ये येतात. गेल्या काही वर्षात अशा काही इमारती कोसळण्यामुळे अनेकांचे मृत्यू झाले आहेत. अशा झोपडपट्टी व जुन्या इमारतीमधील लोकांना ज्यादा चटई क्षेत्र निर्देशांक देऊन चांगल्या दर्जाची घरे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यांनी मंत्रालयास ज्यादा चटई क्षेत्र निर्देशांक पूरविण्याची विनंती केली.

७. रिमेकींग ऑफ मुंबई या संस्थेच्या सदस्याने सी.आर.ई.डी.ए.आय.च्या सदस्याप्रमाणेच मुंबईबाबत आपली भूमिका मांडली. मुंबईतील घरांची समस्या लक्षात घेता त्यांनीही ज्यादा क्षेत्र निर्देशांक पुरविण्याची मागणी केली.

८. ए.सी.ई.लिंक्स च्या सदस्याने वरील प्रमाणेच आपले मते मांडून सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेचे स्वागत केले.

९. अल्कनी मॅन्यूफॅक्चर्स असोसिएशन आणि टाटा केमिकल्सच्या सदस्यांनी असे म्हणणे मांडले की त्यांचे कॉस्टिक सोडा युनिट, मीठ उत्पादन युनिट आणि समुद्राचे पाणी वापरुन तयार करण्यात येणाऱ्या उत्पादनांबाबत कोणतेही नियंत्रण असू नये. सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचने मध्ये अशा युनिटचे आधुनिकीकरण आणि विस्तार करण्यास परवानगी असावी. टाटा केमिकल्सच्या सदस्याने असे मत मांडले की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचने मधील झोनल प्लॅनिंगमध्ये लोकांच्या उपजीविकेचे प्रश्न समाविष्ट करण्यात आले आहेत. मंत्रालयाने या क्षेत्रामध्ये असलेल्या प्रक्लपांनी त्यांची सामाजिक जबाबदारी पार पाडण्याची अट समाविष्ट करावी.

१०. गणेश लेन्झोप्लास्ट च्या सदस्याने असे मत व्यक्त केले की, सागरकिनारा क्षेत्रात सर्व प्रकारच्या उत्पादनांच्या स्टोरेजची व्यवस्था भरण्याची परवानगी आणावी.

११. अध्यक्षांनी सर्व अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर त्यांच्या प्रतिक्रिया योग्य त्या पद्धतीने विचारात घेतल्या जातील असे सांगितले.

सभेचे कामकाज चालविण्याबद्दल अध्यक्षांचे आभार मानून सभा संपली.

## सभेतील उपस्थितांची यादी. (८.७.२००९)

१. प्रोफेसर. एम.एस.स्वामिनाथन,चेअरमन, एम.एस.स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन (एम.एस.एस.आर.एफ.) तिसरा क्रॉस स्ट्रीट, इन्स्टिटयूशनल एरिया. तारामणी, चैन्नई.

२. डॉ. शैलेश नायक, सेक्रेटरी, डिपार्टमेंट ऑफ ओशन डेव्लपमेंट, महासागर भवन, ब्लॉक-१२, सी.जी. ओ.कॉम्प्लेस, लोधी रोड, न्यू दिल्ली-११००३.

३. श्रीमती. सुनिता नारायण, सेन्टर फॉर सायन्स ॲन्ड एनव्हायरमेंट, ४१, तुघलकबाद इन्स्टिटयूशनल एरिया, न्यू दिल्ली – ११००६२.

४. श्री. जे.एम.माऊस्कर, ॲडिशनल सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट ॲन्ड फॉरेस्ट,न्यू दिल्ली.

५. डॉ. नलिनी भट, ॲडव्हायसर, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट ॲन्ड फॉरेस्ट,न्यू दिल्ली.

६. श्री.पी.मदेश्वरन, डॉरेक्टर, डिपार्टमेंट ऑफ डेव्हलपमेंट, मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सेस, न्यू दिल्ली.

७. डॉ.ए.सेंथिल वेल, ॲडिशनल डायरेक्टर, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट ॲन्ड फॉरेस्ट, न्यू दिल्ली.

८. एस.ए.सी.ई.लिंक्स, १४०१, कॉन्टीनेंटल टॉवर, शेर्ली राजन रोड, रिझवी कॉम्प्लेक्स, बान्द्रा वेस्ट, मुंबई-४०००५०.

९. श्री.अमित राजन, महिंद्रा हॉलिडेज,८७३/४, नेताजी सुभाष प्लेस, प्रीतमपुरा, न्यु दिल्ली.

१०. डॉ. व्हाय.आर.सिंग, एक्सीक्यूटिव्ह डायरेक्टर, ए.एम.ए.आय.

११. डॉ. अरुप बासू, टाटा केमिकल्स लिमिटेड, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (ईस्ट), मुंबई - ४०००५९.

१२. श्री. रमेश पिलानी, पोद्रिगेज, एम/एस गणेश बेन्झो प्लास्ट, मरीन लाइन्स, मुंबई.

१३. श्री. थंकाचंद थॉमस, केरला,बिल्डर्स फोरम, कोचिन.

१४. श्री. प्रकाश छल्ला, व्हाइस प्रसिडेंट, सी.आर.इ.ए.आय, चेन्नई.

१५. श्री.जी.पी सावलानी, रेसिडेन्ट डायरेक्टर,सी.आर.इ.डी.ए.आय, १०५, अन्सल भवन, १६, के.जी.मार्ग, न्यू दिल्ली.

१६. द जनरल मॅनेजर (रिअल इस्टेट), अव्हरसेकर ॲन्ड सन्स प्रा.लिमिटेड, १२५२, पुष्पांजली अपार्टमेन्टस, फर्स्ट फ्लोअर, ओल्ड प्रभादेवी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.

१७. द चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डॉयरेक्टर, यूनिटी रिॲलिटी, ॲन्ड डेव्हलपर्स लिमिटेड, के.के.टॉवर ग्राऊन्ड फ्लोअर, परेल टॅन्क रोड, ऑफ जी.डी आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई-४०००१२.

१८. द चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, लोक हाऊसिंग ॲन्ड कन्स्ट्रक्शन्स लिमिटेड, लोक भवन, ग्राऊंड ( फ्लोअर, लोक भारती कॉम्प्लेक्स, मरोळ, मरोशी रोड, अंधेरी (ईस्ट), मुंबई - ४०००५९.

१९. फेडरेशन ऑफ असोशिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई.

२०. रिमेकिंग ऑफ मुंबई फेडरेशन, १८, मोती बिल्डिंग.

२१. श्री. डी.डी.लवानिआ, युनिटी इन्फ्रास प्रोजेक्ट लिमिटेड, मंडोली प्रीझन कॉम्प्लेक्स, हर्षविहार, दिल्ली-९३.

२२. श्री.के.के.शर्मा, मँगलोर केमिकल्स ॲन्ड फर्टिलायसझर्स लिमिटेड, १००२, भिकाजी कामा भवन, न्यू दिल्ली-६६.

२३. श्रीमती निधी लाढा, सी.आय.आय, थापर हाऊस सेकन्ड, १२४, जनपथ, न्यू दिल्ली.

**सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंतिम रुप देण्यासाठी प्राध्या.एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीच्या दि. ११ जुलै २००९ रोजी रुम न. ४०२, ४था मजला, पर्यावरण आणि वन मंत्रालय, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्पलेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली येथे झालेल्या चौथ्या सभेचा गोषवारा**

१. सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेस अंतिम रुप देण्यासाठी प्राध्या. एम.एस.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीची सभा दि. ११.०७.२००९ रोजी पर्यावरण आणि वन मंत्रालयात पार पाडली. चौथ्या सभेमध्ये मच्छिमार आणि मच्छिमारांच्या संस्थांना निमंत्रित करण्यात आले होते. या सभेला उपस्थित व्यक्तींची नावे शेवटी जोडली आहेत.

२. अध्यक्षांनी सभेला उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन सागरकिनारा व्यवस्थापन किनारा क्षेत्र अधिसूचना,२००८ यावर आपली मते मांडण्यास सांगितली.

३. ऑल इंडिया फिशर्स ॲन्ड फिशरीज वर्कर्स फेडरेशनच्या जनरल सेक्रेटरी श्रीमती के. हेमलता यांनी असे मत व्यक्त केले की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना अंमलात आली तर हजारो मच्छिमार विस्थापित होतील आणि त्यांच्या उपजीविकेवर वाईट परिणाम होईल. मोठे-मोठे औद्योगिक प्रकल्प, औष्णिक प्रकल्प, बंदर, इत्यादिंचे बांधकाम समुद्रकिनारयांवर झाल्यास मच्छिमारांचे जीवन उध्वस्त होईल. त्यांनी असे सांगितले की, सागरकिनारा नियमन अधिसूचना क्षेत्र मुळे विकास कामांवर नियंत्रण आहे. तर याउलट सागरीकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचनेमध्ये उद्योगधंदे, रिसॉर्ट, ग्रीन फिल्ड एअरपोर्ट यांना समुद्रकिनाऱ्यावर उभारण्याची मुभा आहे. फेडरेशनने कोणतीही अधिसूचना बनविण्यापूर्वी मोठ्या प्रमाणात लोकमत आजमवण्याची विनंती केली. त्यांनी असेही सांगितले की सागरकिनाऱ्यावरील विकासाचे कोणतेही काम ग्रामसभेच्या परवानगीने व्हावे. राष्ट्रीय मंडळावर ट्रेड युनियनमधील मच्छिमारांच्या प्रतिनिधीला घेण्यात यावे.

४. अहमदाबाद येथील पर्यावरणमित्र श्री.महेश पंड्या यांनी श्रीमती के. हेमलता यांच्या म्हणण्याला दुजोरा देत गुजरातमधील विशेषतः मुंद्रा येथील सागर किनाऱ्यावरील उल्लंघनांचा समितीसमोर उलगडा केला. मुंद्रा भागामध्ये सेझ च्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात खारफूटीची विध्वंस सुरु असल्याचे समितीच्या लक्षात आणून दिले. याविरिद्ध कोणत्याही सरकारी यंत्रणेने प्रतिबंधात्मक पाऊल उचललेले नाही.

५. जूहू नारायण, जूहू मोरागावचे अध्यक्ष श्री मंगेश यांनी मुंबईतील मच्छिमारांच्या जीवनातील हलाखीची परिस्थिती समितीसमोर मांडली. झोपडपट्टी पुर्नविकासाच्या नावाखाली मच्छिमारांच्या जमिनी बिल्डराच्या ताब्यात देण्याचे प्रयत्न राज्यशासनामार्फत होत आहेत आणि मच्छिमारांना त्यांच्याच जागेतून विस्थापित होण्याची परिस्थिती ओढवली आहे. वर्सोवा गावातील बेकायदेशीर इमरतीच्या बांधकामाविरूद्ध त्यांनी गेले काही वर्ष चालविलेला कायदेशीर संघर्षाचे फोटो समितीच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी समितीला अशी विनंती केली की, मच्छिमार समाजाच्या लोकांना त्यांच्या वाढत्या कुटुंबांना समावून घेण्यासाठी त्यांना घरे बांधायची असतील तर त्यासाठी ज्यादा चटई क्षेत्र निर्देशाकांची आवश्यकता आहे.

६. पुण्याहून आलेले श्री. रविंद्र डी. भोसले जे खरतर ०८.०७.०९ च्या विकासकांच्या सभेला हजर राहणार होते. मात्र हजर राहू न शकल्यामुळे त्यांनी सभेते उपस्थित राहण्याची विनंती

केली होती. त्यांनी समितीला असे सूचवले की सागरकिनाऱ्यावरील उंचावरील क्षेत्रात पर्यटन प्रकल्पांना परवानगी देण्यात यावी.

७. म्हाडा अध्यक्ष श्री.टि. एम. पवार यांनी समितीला असे सांगितले की, मुंबईतील १०,००० आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील लोकांना खाफूटीच्या क्षेत्रात मिळालेले प्लॉट विकसित करता येत नाहीत. त्यांनी समितीला अशी विनंती केली की यासंदर्भात अधिसूचनेमध्ये योग्य ती तरतूद करण्यात यावी.

८. ग्रीन पीसच्या प्रतिनिधींनी उपरोक्त म्हणण्यास आपला दुजोरा दिला.

९. अध्यक्षांनी सर्व अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर त्यांच्या प्रतिक्रिया योग्य त्या पद्धतीने विचारात घेतल्या जातील असे सांगितले.

सभेचे कामकाज चालविण्याबद्दल अध्यक्षांचे आभार मानून सभा संपली.

## उपस्थित सदस्यांची नावे ११.७.२००९

१. प्रोफेसर. एम.एस.स्वामिनाथन,चेअरमन, एम.एस.स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन (एम.एस.एस.आर.एफ.) तिसरा क्रॉस स्ट्रीट, इन्स्टिटयूशनल एरिया, तारामणी, चैन्नई.

२. डॉ. शैलेश नायक, सेक्रेटरी, डिपार्टमेंट ऑफ ओशन डेव्लपमेंट, महासागर भवन, ब्लॉक-१२, सी.जी. ओ.कॉम्प्लेस, लोधी रोड, न्यू दिल्ली-११००३.

३. श्रीमती. सुनिता नारायण, सेन्टर फॉर सायन्स अॅन्ड एनव्हायरमेंट, ४१, तुघलकबाद इन्स्टिटयूशनल एरिया, न्यू दिल्ली – ११००६२.

४. श्री. जे.एम.माऊस्कर, अॅडिशनल सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट अॅन्ड फॉरेस्ट,न्यू दिल्ली.

५. डॉ. नलिनी भट, अॅडव्हायजर, मिनिस्ट्री ऑफ एनव्हायरमेंट अॅन्ड फॉरेस्ट,न्यू दिल्ली.

६. डॉ. व्ही. सेल्व्हम, डायरेक्टर, कोस्टल रिसर्च सिस्टम, एम.एस.स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन, तिसरा क्रॉस स्ट्रीट, तारामणी इन्स्टीटयुशनल एरिया, चेन्नई.

७. श्री. पी. मधेश्वरन, डायरेक्टर, डिपार्टमेंट ऑफ ओशन डेव्हलपमेंट, मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सेस, न्यू दिल्ली.

८. डॉ. ए. सेन्थिल वेल, अॅडिशनल डायरेक्टर, मिनिस्ट्री ऑफ एन्व्हायर्नमेंट अँड फॉरेस्ट, न्यू दिल्ली.

९. अॅडव्होकेट लक्ष्मण नारायण, बेडेटर, रुम नं. १०७, शास्त्री नगर, प्रतिक्षा नगर, सायन (पूर्व), मुंबई. मोबाईलः ०९२२१००४०९३.
(ए) फ्रेंडस् ऑफ सोसायटी- एनजीओ.
(बी) नॅशनल असोसिएशन ऑफ फिशरमन
(सी)कोळी महासंघ, मुंबई.

१०. श्रीमती के. हेमलता, जनरल सेक्रेटरी, ऑल इंडिया फिशर्स अँड फिशरीज वर्कर्स फेडरेशन, बी.टी.रणदिवे भवन, १३-ए, रोज अॅव्हेन्यु, न्यू दिल्ली. मोबाईलः ९८६६२८०४१०.

११. श्री. महेश पंड्या, पर्यावरण मित्र, ५०२, राज एव्हेन्यु, थलतेज, अहमदाबाद - ३८००५९. टेलिफोनः (०७९) २६८५१८०१/ २६८५१३२१.

१२. श्री. मंगेरा, चेअरमन, जुहू नारायण, जुहू मोरागाव. आर. आर. एम. रोड, जुहू, मुंबई-४०००४९. मोबाईलः ०९८६९०१९३२५/ ०९८९२४६१५६७.

१३. श्री. संजीव गोपाल, ६०, रिचमंड लॉन, बँगलोर - २५.

१४. श्री. राहुल एन. परवेश, ७१ बी, रत्नसनत सोसायटी, न्यु डि. एन. रोड, अंधेरी वेस्ट, मुंबई - ५३.

१५. श्री. रविंद्र डी. भोसले, श्रुती व्हिला, यमुना नगर, हिगडी, एस. नं. २१, प्लॉट नं. १००, प्राधिकरण, पुणे - ४११०४४. मोबाईलः ९८८१६३६५५८.

१६. श्री. टी. एस. पवार, प्रेसिडेंट, म्हाडा, भूखंड, मुंबई. मोबाईलः ०९८९२७८२४०८.